वर्ष ९ वें अंक ४ था

२४ एप्रिल १९५८

# संजीवन

**जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक**



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

## २९ मार्च १९५८

जेव्हां तुम्हांला बाह्य परिवर्तनाची आवश्यकता भासते तेव्हां त्याचा अर्थ असा असतो कीं, तुमची आंतरिक प्रगति चाललेली नाहीं. कारण ज्याची आंतरिक प्रगति चाललेली असते तो एकाच बाहय परिस्थितींत नेहमीं राहू शकतो; त्या परिस्थितींतहि त्याला नवनवीन सत्यांचें दर्शन होत रहातें.

-- श्रीमाताजी

वर्ष ९ अंक ४था २४ एप्रिल १९५८

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादक :

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

वार्षिक वर्गणी-यथाशक्ति

संपादक—भालचंद्र लिमये.
प्रकाशक—'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.
302/58/4/800

# २४ एप्रिल १९५८

या पृथ्वीवर मानवांमध्यें भगवत्कृपेच्या मुक्तिप्रद कार्याचीं परस्परपूरक अशीं दोन रूपें आहेत. हीं दोन्हीं रूपें सारखींच अत्यावश्यक असलीं तरी त्यांचें महत्त्व सारख्याच प्रमाणांत ओळखलें जात नाहीं.

सर्वाधीश अक्षर शांति, जी चिंता, ताण आणि दु:ख-क्लेश यांपासून मुक्त करते.

सक्रिय सर्वसमर्थ प्रगति, जी श्रृंखला, बंधनें आणि तामसिकता यांपासून मुक्त करते.

शांति ही सार्वत्रिकरीत्या दिव्य म्हणून ओळखली जाते व तिचें महत्वहि सर्वत्र मानलें जाते; परंतु ज्यांची अभीप्सा तीव्र आणि धैर्यपूर्ण आहे असेच लोक मात्र प्रगतीचें स्वागत करतात.

—श्रीमाताजी

# अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ५ |
| २ श्रीमाताजींचीं प्रवचनें | श्रीमाताजी | ८ |
|    १ परीक्षक | | ८ |
|    २ व्यक्तिमत्त्व आणि अहं | | ९ |
|    ३ ज्ञानप्राप्तीमध्यें मनाचें स्थान | | १० |
|    ४ प्रार्थना आणि अभीप्सा | | ११ |
| ३ भवानी मंदिर | श्रीअरविंद | १५ |
| ४ अनुभव आणि दृष्टांत | श्रीअरविंद | २७ |
| ५ विचार शलाका | श्रीअरविंद | २९ |
| ६ सत्यनिष्ठा (विद्यार्थ्यांसाठीं) | श्रीमाताजी | ३२ |
| ८ दिव्य जीवन | श्रीअरविंद | ३८ |
| ९ श्रद्धा | श्रीअरविंद | ४२ |
| १० फुलांचे आध्यात्मिक अर्थ | | ४४ |



वर्ष ९ अंक ४था　　　　　　　　　　　　　　　　　　　२४ एप्रिल १९५८

# संजीवन

**तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,**
**देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.**

**ऋग्वेद–१. ५०. १०**

---

## प्रार्थना आणि ध्यान

१० फेब्रुवारी १९१४

शांतिपूर्ण हृदयानें आणि प्रकाशपूर्ण मनानें, हे प्रभु, आम्ही तुझा इतका जिवंत अनुभव घेत आहोंत कीं त्यामुळें प्रत्येक घटनेकडे समचित्तानें आणि प्रसन्नतेनें आम्ही पाहूं शकतो. तुझा मार्ग आमच्या जीवनांत आम्ही वागवीत असल्यानें तुझा पथ सर्वत्रच आहे हें आम्ही जाणतो. कोणत्याहि परिस्थितीमध्यें आम्ही तुझेच संदेशवाहक आणि तुझेच कार्यसेवक होऊं शकूं हेंहि आम्ही जाणतो.

स्थिर आणि पावन भक्तिभावानें आम्ही तुला वंदन करतो. आम्हाला हें माहीत आहे कीं आमच्या जीवनाचे एकमेव सत्य तूंच आहेस. CWMCE Vol 01 : Page 70

*

१७ मार्च १९१४

ज्यावेळीं भौतिक परिस्थिति थोडीशी कठीण होऊं लागते आणि त्यामुळें कांहीं अस्वस्थता येते त्याचवेळीं जर तुझ्या इच्छेस संपूर्णतया समर्पित कसें व्हावयाचें हें आम्हांला कळलें; व त्यापुढें जीवन अथवा मृत्यू, शारीरिक सुस्थिति अथवा व्यथा आम्हांला क्षुल्लक वाटूं लागल्या तर अशावेळीं आमचें समग्र अस्तित्व तुझ्या प्रेमाच्या व जीवनाच्या कायद्याशीं समस्वरता

प्राप्त करून घेऊं शकते आणि तत्काल सर्व भौतिक अस्वस्थता समाप्त होऊन त्याजागीं स्थिर, गंभीर आणि शांतिपूर्ण सुखदावस्था निर्माण होते.

मी हें पाहिलेलें आहे कीं, शारीरिक सहनशीलतेची अत्यंत आवश्यकता असणारें एकादें कार्य आम्ही करीत असलों तर त्यावेळीं पुढें येणाऱ्या अडचणींचा विचार करण्यानेंच आम्ही सर्वांत अधिक थकून जातो. म्हणून प्रत्येक क्षणीं चालूं क्षणाच्या अडचणीचा फक्त विचार करणें हेंच नेहमीं अधिक शहाणपणाचें ठरते; त्यामुळें प्रयत्नांत अधिक सुलभता येते. कारण त्यावेळीं आपल्या प्रयत्नाच्या प्रमाणांत आपल्याजवळ शक्ति असते, प्रतिकार करण्याचें सामर्थ्य असतें. वास्तविक, शरीर हें एक अद्‌भुत यंत्र, अद्‌भुत साधन आहे परंतु त्याचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हें आपल्या मनाला कळत नाहीं. त्यामुळें शरीराचा लवचिकपणा, नमनीयता, परिस्थितीशीं जुळवून घेण्याची त्याची शक्ति यांची वाढ करण्याऐवजीं पूर्वग्रहदूषित कल्पना व प्रतिकूल सूचना यांमधून निर्माण होणारी एकप्रकारची कठोरताच आपलें मन त्यामध्यें उत्पन्न करते.

परंतु हे प्रभु, तुझ्याशीं तादात्म्य पावणें, तुझ्यावर पूर्ण विश्वास टाकणें, तुझ्यामध्यें निवास करणें, मी 'तूंच' होऊन जाणें हेंच सर्वोच्च शास्त्र आहे; अशारीतीनें तुझी सर्वशक्तिमत्ता अभिव्यक्त करणाऱ्या मनुष्यास अशक्य असें कांहींच रहात नाहीं.

हे प्रभो, माझी अभीप्सा एकाद्या निःशब्द स्तवनाप्रमाणें, मूक पूजनभावानें तुझ्याकडे चढत येत आहे आणि तुझें दिव्य प्रेम माझें अंतरंग उजळीत आहे.

हे दिव्य स्वामी, मी तुला वंदन करीत आहे. CWMCE Vol 01 : Page 101

★

पाँडीचेरी, २९ मार्च १९१४

ओहो, तूं ! तुला आम्हीं जाणलें पाहिजे, समजावून घेतलें पाहिजे, प्राप्त करून घेतलें पाहिजे. हें पूर्ण चैतन्यमया, सनातन तत्त्वरूपा, तूंच, आम्हास पथ-दर्शन करतोस, प्रकाश प्रदान करतोस. आमचें नियमन करतोस व आम्हाला प्रेरणा देतोस; अशी कृपा कर कीं, हे जे दुबळे जीव आहेत ते शक्तिमान् होतील, जे भीरू आहेत त्यांना धीर मिळेल, आश्वासन मिळेल. ज्याप्रमाणें मनुष्यमात्राची भवितव्यता मीं तुझ्यावर सोंपविली आहे त्याचप्रमाणें ह्यांना मीं तुझ्या हातीं सोंपविलें आहे. CWMCE Vol 01 : Page 112

★

३० मार्च १९१४

जे तुझे संपूर्णतया सेवक आहेत, तुझ्या उपस्थितीच्या संपूर्ण चेतनेप्रत जे येऊन पोंचलेले आहेत त्यांच्या समोर असतांना मला किती तीव्रतेनें हा अनुभव येत आहे कीं, मला जें प्राप्त करून घ्यावयाचें आहे त्यापासून मी कितीतरी दूर-फारच दूर आहे; आणि मला हेंहि माहीत आहे कीं, ज्याला मी उच्चतम, श्रेष्ठतम आणि पवित्रतम समजत आहे तें, मला प्राप्त करून घ्यावयाच्या आदर्शाच्या तुलनेनें अगदींच अज्ञानमय आणि अंधःकारमय आहे. परंतु हा अनुभव मला निरुत्साहित करण्याऐवजी माझी अभीप्सा आणि सामर्थ्य वृद्धिंगत करीत आहे. आणि

तुझ्या नियमनाशीं आणि कर्माशीं तद्रूप होण्यासाठीं सर्व अडथळ्यांवर विजय मिळविण्याच्या माझ्या संकल्पास प्रेरणा देत आहे.

हळुहळु क्षितिज निरभ्र होत चाललें आहे; मार्ग सुस्पष्ट होत आहे आणि उत्तरोत्तर अधिक निश्चयात्मक ज्ञानाप्रत आम्ही पुढें जात आहोंत.

घन अंधःकारांत शेंकडों लोक बुडून गेले असले तरी त्यांत विशेष कांहीं चिंतेचें कारण नाहीं. काल ज्यांना आपण पाहिले ते येथें पृथ्वीवर आहेत. ज्यावेळीं त्या अंधःकाराचें प्रकाशांत रूपांतर होईल, तुझीच सत्ता खरोखर पृथ्वीवर सुप्रतिष्ठित होईल असा एक दिवस निश्चित उगवेल हें सिद्ध करण्यास त्यांचें अस्तित्व पुरेसें आहे.

हे नाथ, अद्‌भुत-सृष्टिकारा, जेव्हां मी याचा विचार करते तेव्हां माझें हृदय आनंदानें व कृतज्ञतेनें उचंबळून येतें आणि माझ्या आशेला सीमा रहात नाहीं.

**माझा भक्तिभाव मुग्ध होतो आणि माझा आदर नीरव बनतो.**

—श्रीमाताजी

CWMCE Vol 01 : Page 113

निरर्थक शब्दध्वनींनीं जगाचे कान बधीर झाले आहेत.

★

कृतज्ञता व्यक्त करण्याच्या कमी अधिक पात्रतेवरून व्यक्तीचा थोरपणा मोजला जातो.

★

भागवत चेतनेंत स्वतःस विरून टाकणें हें आपलें उद्दिष्ट नाहीं. तर भागवत चेतना जडतत्त्वांत प्रविष्ट करून तिच्याद्वारां त्याचें रूपांतर होऊं देणें, हें आपलें उद्दिष्ट आहे.

★

हे प्रभु, तुझ्याविना जीवन हें भीषण आहे. तुझा प्रकाश, तुझी चेतना, तुझी सुंदरता, तुझी शक्ति या सर्वांविना अखिल अस्तित्व म्हणजे अशुभ आणि विकृत हास्यास्पद कथा-कल्पना आहे.

★

—श्रीमाताजी

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

१

## परीक्षक

पूर्णयोगाच्या साधनेंत साधकास सतत, खंड न पडतां परीक्षा द्याव्या लागत असतात. कांहींहि पूर्वसूचना न देतां, साधकांस या परीक्षांतून उत्तीर्ण व्हावयाचें असल्यामुळें त्याला नेहमींच सावध व दक्ष राहण्याची आवश्यकता असते.

तीन प्रकारचे परीक्षक या परीक्षा घेत असतात. वरवर पाहतां ते तीन अगदीं वेगवेगळे भासतात; प्रत्येकाच्या परीक्षापद्धती इतक्या भिन्न स्वरूपाच्या, किंवा कधीं कधीं तर परस्पर विरुद्ध दिशेच्या भासतात कीं, त्या सर्वांचें उद्दिष्ट एकच असेल, असें मुळींच वाटत नाहीं; आणि असें असूनहि वास्तविक ते परस्परास पूरक असतात. एकच उद्दिष्ट साधण्याच्या कार्यांत परस्परांच्या परिश्रमाचा परस्परांना उपयोग होत असतो आणि सर्वांगपूर्ण ध्येयाच्या प्राप्तीसाठीं या तिघांचीहि आवश्यकता असते.

नैसर्गिक शक्तींच्याकडून घेतल्या जाणाऱ्या, आध्यात्मिक व दिव्य शक्तींच्या कडून घेतल्या जाणाऱ्या व विरोधी शक्तींच्याकडून घेतल्या जाणाऱ्या अशा या तीन वेगवेगळ्या प्रकारच्या परीक्षा असतात. विरोधी शक्तींच्या परीक्षांचें बाह्य स्वरूप अतिशय फसवें असतें. अचानक अथवा तयारी नसतांच या प्रकारच्या परीक्षेची धाड आपणावर येऊं नये म्हणून साधकास नेहमींच सावध रहावें लागतें. अंतःकरणपूर्वक व नम्रभावानें रहावें लागतें.

जीवनांतील अतिशय क्षुल्लक वाटणारे किरकोळ प्रसंग, नित्याच्या बारीक सारीक घटना, व्यक्ती व त्यांच्या भेटीगांठी, वरवर निरर्थक वाटणाऱ्या गोष्टी, हे सर्व वर दर्शविलेल्या कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारांत मोडणारे, आपले परीक्षकच असतात. या एवढया अवाढव्य व गुंतागुंतीच्या परीक्षापद्धतींत, जीवनांत अति महत्त्वाचे व गंभीर वाटणारे प्रसंग, अति सुलभ परीक्षेचे ठरतात. कारण अशा प्रसंगीं बहुतेक वेळीं तुम्ही सावध राहतां व त्या प्रसंगांना तोंड देण्याकरितां लागणारी तयारी तुम्हीं आगाऊच केलेली असते. रस्त्यांतील लहानशाच धोंड्यावर तुम्ही सहजासहजीं ठेंचकाळतां, कारण त्याकडे तुमचें लक्ष चटकन् जातच नाहीं.

सोशिकपणा, प्रसंगीं निभावून नेण्यास लागणारा लवचिक स्वभाव, आनंदीवृत्ति, व निर्भयपणा या गुणांच्या बळावर भौतिक निसर्गाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेंत आपणांस उत्तीर्ण होतां येतें.

उच्च आकांक्षा, आत्मविश्वास, तत्परता, उत्साह व आत्मसमर्पणांतील उदारता यांची आध्यात्मिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीं जरूर असते. सावधानता, सचोटी, लीनता या गोष्टी

विरोधी शक्तीकडून होणाऱ्या परीक्षेंतून पार पडण्यास आवश्यक असतात.

परीक्षा देणारे वेगळे व परीक्षा घेणारे कोणी वेगवेगळे असतात असें समजूं नका. प्रसंग विशेषीं त्या त्या वेळीं दोन्हींहि आपणच असतो. कधीं परीक्षक तर कधीं परीक्षार्थी; कांहीं वेळां तर परीक्षार्थी व परीक्षक दोन्हीहि एकाच वेळीं आपण स्वतःच होत असतो. या परीक्षांपासून जो कांहीं लाभ व्हावयाचा तो आपल्या महदाकांक्षेच्या तीव्रतेवर व उच्चतेवर आणि आपल्या ठिकाणच्या जाणीवेच्या जागृतीवर अवलंबून असतो.

शेवटीं एक विशेष सूचना द्यावयाचीः कधींहि परीक्षकाचा आंव आणूं नका. आपण मोठ्या महत्त्वाच्या व कठीण परीक्षा-प्रसंगांत आहोंत अशी आठवण असणें हें कधीं कधीं इष्ट ठरतें; पण उलट दुसऱ्यांची परीक्षा घेण्याचें काम आपण करावयाचें आहे, अशी कल्पना बाळगणें नेहमींच धोक्याचें असतें. हास्यास्पद व घातकी अहंकाराचा आपल्या चारित्र्यास कलंक लागण्याचा तो सर्वांत सोपा मार्ग आहे. हें निर्णय देण्याचें कार्य सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या बुद्धिमत्तेचें आहे. अजाण मानवाच्या अज्ञानी इच्छाशक्तीचें नव्हे.

१२ नोव्हेंबर १९५७

CWMCE Vol 14 : Page 42

२

# व्यक्तिमत्व आणि अहं

**ज्याला व्यक्तिमत्त्व म्हणतात, तें म्हणजे आपला 'अहंकार'च नव्हे कां ?**

असा हा समजुतीचा घोटाळा बऱ्याच वेळां होतो. तसें असेल तर अहंकार हा एक असत्य व भ्रम असल्यामुळें, बौद्ध व शांकर प्रतिपादन करतात त्याप्रमाणें व्यक्तिमत्त्व हेंहि एक असत्य व भ्रम ठरेल. परंतु, वास्तविक व्यक्तिमत्त्वाचा उगम प्रत्यक्ष परमेश्वरापासून झालेला आहे. त्याचेंच तात्पुरतें एक विकृत स्वरूप म्हणजे अहंकार. त्याचा कांहीं कालापुरता उपयोग असतो. जेव्हां त्याची उपयुक्तता संपते व त्याजागीं सत्यचेतना सर्वत्र पुनरपि प्रस्थापित होते, तेव्हां तो नाहींसा होतो.

प्रत्येक वस्तूमध्यें असलेली चेतना ही एकच एक आहे. या विश्वरचनेमधील हें परम रहस्य आहे. पण ही चेतना व्यक्तरूप धारण करतांच, बहिर्मुख होऊन विस्तारूं लागतांच तिचे असंख्य विभाग होतात. तिचा विस्तार होण्यासाठीं ह्याची आवश्यकताच असते. त्या एकेक विभागापासूनच एकेक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घटित होऊं लागतें.

अशा या प्रत्येक साकार व्यक्तिमत्त्वाचें उगमस्थान त्याच्या अस्तित्वाचा मूळ धर्म अथवा त्याचें वास्तव सत्य स्वरूप असतें. जर प्रत्येक साकार वस्तूस असा आधार नसता, नियम नसता, त्याचें त्याचें स्वतंत्र सत्य स्वरूप नसतें तर, आज आपण पाहतो अशीं असंख्य व्यक्तरूपें या सृष्टींत उत्पन्न होणें अशक्यच झालें असतें. कांहीं सामूहिक मूर्तरूपें कदाचित् व्यक्तदशेस आलीं असतीं, पण व्यक्तिगत स्वतंत्र चेतनाकेंद्रें, आजच्या प्रमाणें उत्पन्न झालेलीं दिसलीं नसतीं. 'एकं' पासून 'बहु', हा जो बदल झाला त्याचें गमक प्रत्येक व्यक्तरूपानें सूचित केलें

जातें. चेतनेचीं नाना केंद्रें, सत्याचें नाना अंश, अस्तित्वास आधारभूत झालेलीं नाना तत्त्वें या अनंत कोटी रूपांत विलसणाऱ्या विश्वांत समाविष्ट असतात. पुढें त्या प्रत्येकास स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त होतें.

हें प्रत्येक मूर्तरूप व्यक्तिमत्त्वाच्या घटनेसाठीं आपल्या मूळ रूपापासून दूर गेलेलें, अलग झालेलें दिसतें. पण आपल्या मूळरूपाची पूर्ण जाणीव झाली, सत्य स्वरूपाचा साक्षात्कार झाला म्हणजे आंतरिक एकत्वानुभवाच्या बळावर विविधतेंतहि व्यक्तीस आपल्या मूळच्या एकरूपत्वाचा अनुभव सतत येत राहतो.

आज आपल्याला जें विश्वाचें स्वरूप दिसतें त्याचें कारण हें आहे. कित्येक व्यक्तिमत्त्वें निर्माण व्हावीं म्हणून तर ह्या विश्वाची उत्पत्ति झाली. स्वतःच्या रूपाची जाणीव व्हावी, म्हणून सर्वश्रेष्ठ परमेश्वरानें स्वतःचें रूप स्वतःसमोर प्रकट केलें, स्वदर्शन घेतलें, आणि त्यामुळें या विश्वाची निर्मिति झाली.

३

## ज्ञानप्राप्तीमध्यें मनाचें स्थान

**मनाच्या मदतीनें मूल्यमापन करणें व ज्ञान करून घेणें शक्य आहे काय ?**

कोणत्याहि वस्तूविषयीं अथवा व्यक्तीविषयीं बरेंवाईट ठरविण्याचें काम मनास कधींहि करूं देतां कामा नये; हें चांगलें आहे, हें वाईट आहे, ह्या मनुष्याच्या अंगीं अमुक दोष आहे, तो मनुष्य तसाच वागतो, अशा प्रकारचे अभिप्राय देण्याचें काम मनावर कधींहि सोंपवूं नये. कारण मनाचें काम चालतें अज्ञानांत राहून; वस्तूविषयीं त्यास ज्ञान नसतें; वस्तुमात्राकडे पाहण्याची खरी दृष्टि त्याला नसते.

विचाराच्या प्रांताच्या पलीकडे आणि अत्यंत उच्च क्षेत्रामध्यें ज्ञान वसत असतें. विचाराच्या साह्यानें ज्या शुद्ध कल्पना आपण व्यक्त करण्याचा यत्न करतो, त्या शुद्ध कल्पनांच्याहि पलीकडे ज्ञान असतें. समजा, विचारांचें क्षेत्र ओलांडून आपण शुद्ध कल्पना-क्षेत्रापर्यंत जाऊं शकत असलों तरी, शुद्ध कल्पना म्हणजे केवळ ज्ञानाचा पडसांद असल्याकारणानें, आपण ज्ञानक्षेत्रांत जाऊं शकूंच असें नाहीं.

प्रत्यक्ष ज्ञान हें केवळ एकात्मभावाच्या साह्यानेंच मिळवितां येईल.

असें असूनहि क्षुद्र मानवी मनाची मूर्ति, सतत भौतिक चेतनेंतच गुरफटलेली मनोभावना स्वतःच्या अभिप्रायाविषयीं, ज्ञानदृष्टीविषयीं काय पण अभिमान बाळगते ! आपण जणुं उच्च शिखरावर आहोंत असें समजून आपलें मन जेव्हां वस्तूकडे वा व्यक्तींकडे पाहतें आणि सरळ सरळ मत ठोकून देतें—निर्णय जाहीर करतें—'हें वाईट आहे', 'हें असें असतां कामा नये', किंवा 'हें अमुकच इष्ट आहे, हेंच योग्य आहे'. त्याचें हें करणें किती हास्यास्पद आहे !

थोडेंतरी शहाणपण शिकावयाचें असेल तर, वस्तूंचें निरीक्षण अति सावधपणें तुम्ही करीत जा. कांहींहि अभिप्राय व्यक्त न करतां त्यांचा अंतःकरणावर नुसता संस्कार घ्या. शांत-

पणानें अंतरंगांत त्यांचा संग्रह केला म्हणजे मग तुमच्या जाणीवेच्या उच्चतर शक्तीसमोर ते संस्कार निर्णयासाठीं ठेवा. तुम्ही स्वतः मात्र शांतचित्त व सावध राहून वाट पहा.

नंतरच कदाचित् मंद गतीनें, दूर दूर प्रदेशांतून अति उंच उंच क्षेत्रांतून कांहीं प्रकाश प्रकट होईल आणि दिव्य सत्याचें थोडेसें अधिक ज्ञान तुम्हाला होईल.

४

# प्रार्थना आणि अभीप्सा

प्रार्थनेचे अनेक प्रकार असतात. एक, केवळ यांत्रिक व शाब्दिक प्रार्थना, म्हणजेच मुखोद्‌गत केलेले शब्द यंत्रासारखे पुनःपुनः उच्चारणें. अशी प्रार्थना विशेष अर्थपूर्ण नसते. तिचा सामान्यतः एकच परिणाम होतो. प्रार्थना करणारा मनुष्य शांत होतो. पुनःपुनः अनेकदां प्रार्थना म्हणत राहिल्यास अखेरीस मन शांत होऊन जातें.

आणखी एक प्रार्थना असते. जें कांहीं प्रार्थनेंत मागावयाचें असतें तें अगदीं अचूक शब्द-रूपांत, सूत्ररूपानें उत्स्फूर्तपणानें व्यक्त होतें. एकाद्या गोष्टीविषयीं, एकाद्या व्यक्तीसंबंधीं, कांहीं विशिष्ट परिस्थितिबद्दल देखील किंवा स्वतः करतां तुम्ही प्रार्थना करूं शकतां. अथवा भगवंतानें तुमच्याकरतां जें कांहीं केलें असेल त्याकरतां, भगवंताविषयीं कृतज्ञतादर्शक असें जें कांहीं करण्याची तुमची इच्छा असेल त्याकरतांहि तुम्ही प्रार्थना करूं शकतां. हें उघडच आहे कीं, अशा प्रकारची प्रार्थना ही अत्युच्च कोटींतील प्रार्थना असते; कारण या प्रकारच्या प्रार्थनेंत केवळ स्वतः संबंधींचेंच मागणें नसतें तर त्यांत केवळ शुद्ध कृतज्ञताभाव व्यक्त झालेला असतो.

अशी कृतज्ञताभाव व्यक्त करणारी प्रार्थना म्हणजे प्रार्थना व अभीप्सा यांचा संगम. जो अनुभव जीवनांत प्रत्यक्ष घेतलेला असतो तो उत्स्फूर्तपणें शब्दरूपांत व्यक्त होणें म्हणजे अशा तऱ्हेची प्रार्थना. ती अंतर्यामांतून वर उसळते, एका अगाध अनुभूतीचा तो उद्‌गार असतो. ही अनुभूति देण्याची कृपा केल्याबद्दल स्तुतिसुमनें उधळण्याची ती एक उत्कट इच्छा असते. हा अनुभव पुढेंहि येत रहावा अथवा त्याचें स्वरूप स्पष्ट व्हावें अशी त्यांत इच्छा असते. हें स्वरूप जवळ जवळ अभीप्सेसारखेंच असते.

आणखी एक प्रार्थना असते. ती उत्स्फूर्त व निरपेक्ष असते; जणुं ती एक आर्त हांक असते. भगवंताच्या मदतीकरतां केलेला धांवा असतो; तो अत्यंत प्रभावी असतो. अशा प्रार्थना तत्काळ फलद्रूप झाल्याचीं अगणित उदाहरणें मजजवळ आहेत. ही प्रार्थना म्हणजेच एक परम श्रद्धा, एक महान् उत्कटता, एक महान् मनःपूर्वकता, हृदयाची अत्यंत सरलता. अशा प्रार्थनेमागची ही सरल वृत्ति मोजमाप करीत नाहीं, स्वतःच्या कल्पना रचून त्या करतां मागणी करत नाहीं, देवाशीं सौदा करत नाहीं किंवा जें कांहीं द्यायचें तें देतांना परतफेड होईल या आशेनें देत नाहीं.



*

प्रार्थना कोणत्याहि भूमिकेवरून करतां येते. प्रार्थना करतांना ज्या भूमिकेवर तुम्ही असतां त्या भूमिकेस अनुरूप अशीच प्रार्थना होत असते.

प्रार्थना केवळ भौतिक, नव्हे, जड वस्तूसंबंधींहि असू शकतात. भावना-वासनात्मक, मानसिक, आत्मिक अथवा आध्यात्मिकहि प्रार्थना असतात. प्रत्येक प्रार्थनेचें स्वरूप वेगळें आणि तिचें महत्वहि वेगळें असतें.

प्रार्थना ही अभीप्सेहून, आकांक्षेहून अधिक बाह्य स्वरूपाची असते. सामान्यतः एकादें निश्चित उद्दिष्ट पुढें ठेवून ती केलेली असून नेहमीं शब्दरूपांत व्यक्त करतां येतें; कारण शब्द-रूप सूत्र म्हणजेच प्रार्थना. एकाद्या व्यक्तीची अभीप्सा जेव्हां शब्दांत मांडली जाते तेव्हां 'आवाहना' चेंच तें एक अंग होतें.

सर्व दृष्टींनीं पहातां असें दिसतें कीं, अभीप्सा ही प्रार्थनेपेक्षां महान् असते, तिच्या अतीत असते. अभीप्सेंत प्रार्थनेहून कितीतरी अधिक आत्म-विस्मृति असते; जें कांहीं करण्याचा किंवा बनण्याचा आपला निश्चय असतो त्यांतच केवळ रहाणारी, जें कांहीं भगवंतास अर्पण करण्याचा प्रयत्न असतो त्या अर्पणभावांतच केवळ रहाणारी अशी अभीप्सा असते. साध-काची अभीप्सा कोणत्याहि पातळीवरील असली तरी आत्मा हेंच तिचें केंद्रस्थान असतें.

★

एकाद्या अवस्थेंत असावें अशी तुमची अभीप्सा असते. आपल्या ध्येयाशीं विसंगत, कांहीं संदिग्ध किंवा अज्ञानप्रेरित आंतरिक क्रिया किंवा एखादी दुष्ट इच्छा देखील, अथवा ज्याची प्राप्ति करून घ्यावयाची आहे त्याच्या विरोधी कांहीं तरी––असें कांहीं तुमच्यामध्यें असल्याचें तुमच्या ध्यानीं येतें. अशा प्रसंगीं तुम्ही शब्दरूपानें प्रतीक्षा करीत बसत नाहीं, पण तुमच्या ठिकाणीं ज्वालेप्रमाणें कांहीं तरी जागृत होतें. एका महान्, विशाल, अधिक अधिक स्पष्ट, निश्चित अशा अस्तित्वाची-जीवनाची प्रतीक्षा तुम्ही करतां, हा जिवंत अनुभव तुम्ही जणू सर्मपित करतां. कालांतरानें ज्यावेळीं ही अनुभूति आठवून तिची नोंद करण्याचा प्रयत्न होतो त्यावेळीं तीस शब्दरूप देतां येणें शक्य असतें.

ऊर्ध्वगामी ज्वालेप्रमाणें अभीप्सा एकदम प्रकट होतें; जें बनण्याची, करण्याची, प्राप्त करून घेण्याची, साधकास इच्छा असते तें सारें तींत अनुस्यूत असतें. मीं 'इच्छा' असें म्हटलें पण 'अभीप्सा' हाच योग्य शब्द आहे; कारण अभीप्सेचे गुणधर्म अथवा स्वरूप वासनेप्रमाणें, इच्छेप्रमाणें नसतें. वास्तविक पाहिलें तर अभीप्सा म्हणजे संकल्पाची परिशुद्धि करणारी एक महान् ज्योति असून, ज्याचा साक्षात्कार करून घ्यायचा असतो ती गोष्ट तिच्या केंद्रस्थानीं असते.

★ CWMCE : Vol 05 : Page 142

असें पहा कीं तुमच्या हातून कांहीं घडून गेलें आहे आणि तसें घडल्याबद्दल आतां तुम्हांला वाईट वाटतें आहे. त्यामुळें अनिष्ट परिणाम झाले आहेत. परिस्थिति चिंताजनक झाली आहे, आणि तिची झळ इतर व्यक्तींनाहि लागली आहे. या बाबतींत इतरांची प्रतिक्रिया काय आहे तें तुम्हाला माहीत नाहीं. तथापि तुमच्यापुरतें बोलावयाचें झालें तर तुम्हाला असें वाटतें कीं, जें घडून गेलें आहे त्यांतून कांहीं चांगलें निष्पन्न व्हावें, जर अपराध घडला असेल

तर तो कबूल करावा; इतकेंच नव्हे तर हा प्रसंगच, अधिक प्रगतीसाठीं उपयोगी पडावा. त्यामुळें भगवत्प्राप्तीच्या मार्गांत एक नवीन पाऊल पडावें. अधिक स्पष्ट, अधिक सत्य, अधिक उत्कट अशा भावी जीवनाचा मार्ग मोकळा करण्यासाठीं या प्रसंगाचा उपयोग व्हावा.

त्यावेळीं तुमच्या ठिकाणीं शक्ति एकवटते व वर उफाळते. प्रचंड आंदोलनाप्रमाणें वर वर चढत जाते. कधीं कधीं तिला शब्दरूपहि येत नाहीं; निःशब्द, अप्रकट, पण ज्वाले-प्रमाणें तिचें स्वरूप असतें.

ती खरी अभीप्सा. असा अनुभव प्रतिदिनीं शेंकडों वेळां, नव्हे, हजारदांहि येणें शक्य आहे. मात्र, सतत प्रगति व्हावी, आपण अधिक सत्यपूर्ण व्हावें, भगवत्संकल्पाप्रमाणें आपणा-कडून जी अपेक्षा आहे तिच्याशीं अधिक समग्र सुसंवाद राखता यावा अशा मनःस्थितींत तुम्ही असलें पाहिजे.

CWMCE : Vol 05 : Page 142

*

प्रार्थना ही नेहमीं कोणाची तरी करावी लागते. कांहीं लोकांच्या विश्वविषयक कल्पनेंत भगवत्विषयक कल्पनेस स्थानच नसतें; आणि असे बरेंच लोक असतात. सर्वज्ञ, सर्वशक्ति-मान् आणि अतुलनीय प्रचंड असें कांहीं अस्तित्व असावें ही कल्पनाच मुळीं त्यांना त्रस्त करते. त्यांच्या आत्मप्रौढीस धक्का देणारी ही कल्पना असल्यानें त्यांच्या जगत् रचनेंत भगवंतास जागा नसते. असे लोक कोणाची प्रार्थना करणार? स्वतःचीच? पण तशी तर साधारणपणें रीत नाहीं. परंतु भगवंतावर श्रद्धा नसली तरीहि अभीप्सा असूं शकते.— उदा० विशिष्ट स्थितीसाठीं, ज्ञानासाठीं, साक्षात्कारासाठीं, जाणीवेच्या एका विशिष्ट अवस्थे-साठीं, कशासाठीं तरी अभीप्सा ही असतेच. देवाच्या अस्तित्वावर विश्वास न ठेवणारे लोक असतात; पण त्यांची प्रगतीवर-विकासावर श्रद्धा असते. त्यांना असा विश्वास वाटत असतो कीं, जग सतत प्रगतिपथावर असून ती प्रगति-यात्रा अनंतपणें व अविरत चालेल.— 'अधिक चांगल्यांतून' सर्वांत चांगल्याकडे हें विश्व नित्य जात राहील, अशी त्यांची श्रद्धा असते. खरोखरीच अशा लोकांची अभीप्सा फार मोठी असूं शकते, मग भगवंताच्या अस्तित्वावर त्यांची श्रद्धा नसेना कां!

अभीप्सा म्हटलीं कीं तींत आपोआप श्रद्धा येतेच. तथापि ती भगवंताच्या अस्तित्वा-वरच असेल असें नाहीं. प्रार्थना मात्र भगवंताला उद्देशून नसेल तर ती प्रार्थनाच असूं शक-णार नाहीं.

CWMCE : Vol 05 : Page 144

*

प्रार्थना ही साकार सगुण व्यक्तीजवळ करायची नाहीं म्हटलें तर, मग ती प्रार्थना ती काय राहिली? जो कोणी तुमची प्रार्थना लक्षपूर्वक ऐकूं शकतो त्यालाच तुम्ही प्रार्थना करतां. कोणी ऐकणाराच नसेल तर प्रार्थना कशी करतां येईल? म्हणून तुम्हीं जर प्रार्थना करीतच असाल तर त्याचा अर्थ इतकाच कीं, तुम्ही मान्य करा अथवा न करा, तुमच्यापेक्षां अनंत-पटीनें मोठें आणि जें तुमच्या भवितव्यतेचें आणि तुमचें स्वतःचें परिवर्तन करूं शकेल अशा

कशावर तरी तुमचा विश्वास आहे, हें त्यांत गृहीत आहे. मात्र तुमची प्रार्थना ऐकली जाईल अशा पद्धतीनें तुम्हीं ती केली पाहिजे.

बुद्धिवादी लोक अभीप्सा मानतात, पण प्रार्थनेला कमी लेखतात. गूढवादी म्हणतात कीं, अभीप्सा ठीक आहे, पण जर कां आपली इच्छा ऐकली जावी आणि ती भगवन्तानें ऐकावी अशी इच्छा असेल तर प्रार्थना करायलाच हवी. बालकाच्या साध्या भोळ्या भावनेनें, संपूर्ण निष्कपट ऋजुतेनें, म्हणजेच संपूर्णतया विश्वास टाकून प्रार्थना केली पाहिजे. "मला अमुक एका गोष्टीची गरज आहे"—मग ती गोष्ट नैतिक असो वा भौतिक असो—"मी तीसंबंधीं तुजजवळ याचना करीत आहे—मला ती दे."

"जें जें प्रार्थिलें तें तें तूं पूर्ण केलेस. अज्ञात अशा अनुभूतींचा निकट स्पर्श तूं मला करून दिला आहेस, आणि आतां ते अनुभव मनास येईल तेव्हां घेतां येतात. असीम कृतज्ञताभावानें मला भरून येतें आणि तुझ्या कृपाप्रसादाबद्दल हें कृतज्ञतासूक्त मी तुझ्या चरणीं निवेदन करत आहे."

CWMCE Vol 05 : Page 145

*

नंदादीप लावून त्या दीपज्योतीसमोर हात जोडून, गुडघे टेंकून बसण्याऐवजीं तुमच्या हृदयाच्या गाभाऱ्यांत ज्योत तेवत ठेवा आणि मग अधिक सुंदर, अधिक सत्य, अधिक उदात्त, अधिक कल्याणकर यासाठीं प्रबल अभीप्सा जागृत ठेवा.

"मला जें जें माहीत नाहीं तें सारें मला उद्यां समजायला लागूं दे, मला जें जें करतां येत नाहीं तें मला अधिकाधिक करण्यास यायला लागूं दे. अशी माझी प्रार्थना आहे"—असें प्रत्येक दिवशीं म्हणत जा.

जगांतील नाना दुःखांनीं जर तुम्ही वेढलेले असाल, तुमचे मित्र दुःखी कष्टी असतील, तुमच्या आप्तेष्टांमागें दुःखभोग लागले असतील, तुम्ही अडचणींत सांपडलें असाल तर अशी प्रार्थना करावी :—"प्रकट होणाऱ्या भावी दैवी पूर्णतेप्रत माझें संपूर्ण भान, माझी संपूर्ण चेतना समग्रतया उंचावूं दे. ज्यामुळें जग इतकें दुःखी होऊन गेलें आहे तें हें सारें अज्ञान उज्ज्वल ज्ञानांत रूपांतरित होवो! असदिच्छेबर ज्ञानाचा प्रकाशझोत पडून तिचें सदिच्छेंत रूपांतर होवो."

तुमची कार्यक्षमता आणि तुमची समजशक्ति यांच्या मानानें किंवा हृदयाचे सारे भाव ओतून तुम्ही जितकी इच्छा कराल त्यामानानें तसें प्रत्यक्ष घडून येईल. आणि ही इच्छा प्रार्थनेचें रूप घेईल. तुमच्याहून ज्ञानपूर्ण, कार्यक्षम आणि सामर्थ्यसंपन्न शक्तीनें साह्य करावें अशी तुम्ही प्रार्थना कराल.....आणि अशा प्रार्थना खरोखर किती सुंदर असतील!

—श्रीमाताजी

# भवानी मंदिर

(१९०५ साली श्रीअरविंदांनीं तयार केलेली तरुणांच्या संघटनेची एक योजना. अनुवाद श्री० म० म० द० वा० पोतदार यांनीं करून दिला आहे.—संपादक)

## ॐ नमश्चंडिकायै

दरीटेकडयामध्यें एक मंदिर उभारावयाचें आहे आणि तें श्री भवानीमातेच्या चरणीं वहावयाचें आहे. या पवित्र कार्यांत सहाय्यभूत व्हावें म्हणून मातेच्या सर्व लेकरांना हें आवाहन करण्यांत येत आहे.

## भवानी माता कोण?

भवानी माता कोण आहे आणि तिच्यासाठीं आपण मंदिर कां उभारावयाचें ?

## भवानी म्हणजे अनंत चित्शक्ति होय.

जगताचीं अनंत भ्रमणें चालू असतांना जेव्हां त्या शाश्वताचें चक्र वेगानें फिरत असतें त्यावेळीं त्या शाश्वतांतून जी अनंत चित्शक्ति बाहेर पडून त्या चक्राला प्रेरणा देत असते ती चित्शक्ति विविध प्रकारांनी आणि अनंत रूपांनीं मनुष्याला दृग्गोचर होते. यांतील प्रत्येक प्रकार एका विशिष्ट युगाचे सर्जन करतो. कधीं ती शक्ति **प्रेम** रूपानें प्रगट होते, कधीं ती **ज्ञान** होते तर कधीं **त्याग** होते आणि कधीं **करुणा** तर कधीं ती **दया** होते. ही अनंत शक्ति म्हणजेच भवानी होय. दुर्गा म्हणजे तीच, काली ही तीच, प्रियतमा राधा ही तीच, तीच लक्ष्मी, तीच आमची माता आणि तीच आम्हां सर्वांची जन्मदात्री.

## भवानी हीच शक्ति

प्रस्तुत युगांत ही माता शक्ति-माता म्हणून आविष्कृत होते. ती शुद्ध शक्ति होय.

## सर्व जगत् शक्तिरूपी मातेनें व्याप्त होऊन वृद्धि पावत आहे.

क्षणभर आपण डोळे उघडूं या व भोंवतालच्या जगाकडे दृष्टिक्षेप करूं या. जिकडे आपण दृष्टि फिरवावी तिकडे शक्तीचे प्रचंड डोंगर आपल्या समोर उभे राहतात.

भयंकर, वेगवान्, अनावर डोंगर, चित्शक्तीच्या विशाल आकृती, शक्तीचे भयानक चलस्तंभ आपणां समोर ठाकतात ! ज्ञात इतिहासामध्यें पूर्वी प्रतीत झाले त्यांच्यापेक्षां दसपट बलवान आणि प्रचंड, शतपट भयंकर वेगवान आणि उद्योगशील, आणि सहस्रपट साधनसंपन्न, यंत्रपूर्ण शस्त्रयुक्त, अशी युद्धशक्ति, अर्थशक्ति आणि विज्ञानशक्ति आज दिसत आहे. माता सर्वत्र उद्योगांत गुंतलेली आहे आणि तिच्या प्रचंड आणि कारक भुजांच्या द्वारां विशाल राक्षस, असुर, देव यांचे आकार आणि रूपें जगाच्या प्रांगणावर उडया घेत अवतीर्ण होत आहेत. पश्चिमेकडे बलवान अशा मोठाल्या साम्राज्यांचा शनैः शनैः झालेला उदय आपण पाहिला आहे. आणि अदम्य वेगानें व आवेशानें उसळून जन्मास येणाऱ्या जपानचे जीवन ही पाहिलेलें आहे. कृष्णमेघानें आच्छादित अथवा तम अथवा रज यांनीं रक्तरंजित अशा कित्येक म्लेंच्छ शक्ती येथें आहेत. दुसऱ्या आर्य शक्ति असून त्याग आणि शुद्ध आत्मबलिदान यांच्या पवित्र ज्योतिमध्यें त्या बुडालेल्या आहेत; पण हे सर्व आविष्कार मातेच्या नवीन अवताराचे आहेत; नव्या बांधणीचे आणि नव्या सर्जनाचे आहेत. माता जीर्णामध्यें आपली आत्मशक्ति ओतीत आहे. माता नवजीवनाच्या भ्रमणांतून उदीत होत आहे.

## भारतांत आपण शक्तीच्या अभावामुळें सर्व गोष्टींत पराभूत होत आहोंत.

परंतु भारतांत तें शक्तीचें श्वसन अत्यंत मंद होत आहे आणि स्फूर्तीचा उदय होण्यास फार विलंब लागत आहे. हें सत्य आहे. आमची प्राचीन भारतमाता पुनरुज्जीवनाकरितां खचित धडपडत आहे. दुःखावेगानें ती अश्रू गाळीत आहे. परंतु तिचे हे श्रम व्यर्थ जात आहेत. येवढी विशाल असून आणि सहज समर्थ होईल अशी असतांना तिला कसलें दुःख आहे ? खचित कोठेंतरी फार भयंकर असा दोष दडलेला आहे; कोठेतरी कांहीं प्राणभूत सत्वाची आमच्यांत वाण आहे आणि त्यावर नेमके बोट ठेवणें कांहीं कठीण नाहीं. आमच्याजवळ सर्व गोष्टी आहेत परंतु आम्ही शक्तिविना रिते आहोंत. येथें चित् शक्तीची पोकळी आहे. आम्ही शक्तीचा त्याग केला आहे आणि म्हणून शक्तीनें आमचा त्याग केला आहे. मातेचा वास आमच्या हृदयांत नाहीं, आमच्या मेंदूत नाहीं, आमच्या बाहूंत नाहीं.

पुनर्जन्माची इच्छा आमच्या ठायीं प्रबळ आहे. तेथें कांहीं उणीव नाहीं. कितीतरी प्रयत्न झालेले आहेत. धर्मसंबंधीं, समाजसंबंधीं, राजकारण संबंधीं कितीतरी आंदोलनें करण्यांत आली आहेत. परंतु एकच गति सर्वांना कवळीत आहे. क्षणभर तीं आंदोलनें फोफावतात मग त्यांचा जोर ओसरतो, तेज नष्ट होतें आणि त्याही उपर ती जिवंत राहिलीं तर केवळ पोकळ कवचें म्हणून ! ज्यांतून ब्रह्म निघून गेलें आहे म्हणजेच जेथें तम आणि निष्क्रियता यांनीं सर्व व्यापलें आहे असे शुद्ध सांगाडे. आपला आरंभ फार मोठा असतो परतु त्यामागें ना फूल ना फळ.

आतां आपण नव्या रस्त्यानें जाण्याला प्रारंभ केला आहे. आतां आपण एका नव्या औद्योगिक आंदोलनाला प्रारंभ केला आहे. आणि या दीन दरिद्री भूमीचें पुनरुज्जीवन करून तिला पुन्हां श्रीमंत बनवावयाची आहे. मागच्या अनुभवानें शहाणे न होतां जरकरतां आपण एक मुद्याची गोष्ट साधली नाहीं, म्हणजेच जर आपण शक्ति संपादिली नाहीं तर हें आंदोलनहि मागच्या आंदोलनाच्या वाटेलाच लागले पाहिजे.

## शक्तीच्या अभावीं आमचें ज्ञान ही एक मृत वस्तु झाली आहे.

काय, तर मग ज्ञानाची उणीव आहे काय? आम्ही भारतीय तर, मनुष्य जातीचा उदय झाला तेव्हांपासून जेथें ज्ञानाचा सतत संग्रह होत आहे आणि जेथें ज्ञान सांचविलें जात आहे अशा देशांत जन्मलों आणि वाढलों आणि शेंकडो हजारो वर्षें त्या संचित ज्ञानाचा वारसा घेऊन उभे आहोत. आजही आमच्यामध्यें प्रकांड ज्ञानमहर्षी जन्माला येतात आणि ज्ञान भांडारांत भर घालतात. आमची शक्ति संकोचली नाहीं. आमच्या बुद्धीची धार बोथट झाली नाहीं किंवा ती गंजली नाहीं. तिची ग्राहक शक्ति आणि तिचें चापल्य हें पूर्वींइतकेंच विविध आहे परंतु तें ज्ञान मृत आहे. त्याच्या ओझ्याखालीं आम्ही नमून गेलों आहोत. ते विष आम्हास जाळीत आहे. वस्तुतः त्याचा आम्हांला, आमच्या पायांना, काठीसारखा, आमच्या हातांना शस्त्रांसारखा आधार मिळावा; कारण सर्व मोठ्या वस्तूंचा असा धर्म आहे कीं, जेव्हां त्यांचा उपयोग केला जात नाहीं अथवा त्याचा दुरुपयोग केला जातो तेव्हां त्या उपयोगकर्त्यावरच उलटतात आणि त्याचा नाश करतात.

तर मग तमाच्या जड भाराखालीं दबून गेलेलें आमचें ज्ञान हें निष्क्रियतेच्या आणि निःशक्ततेच्या शापानें ग्रस्त होऊन पडलें आहे. अलीकडे आम्हांला मधून मधून असा भ्रम होतो कीं आम्ही जर विज्ञान प्राप्त करून घेतलें तर आमचें सर्व खचित भलें होईल. तर मग आपण स्वतःला प्रथम असा प्रश्न विचारू या कीं, आपल्या संग्रहीं जें ज्ञान आहे त्याचें आपण काय केलें आहे? अथवा विज्ञानाची प्राप्ति जे करून घेऊन चुकले आहेत, ते भारता-करितां काय करूं शकले आहेत? स्वयंप्रतिभेच्या अभावीं केवळ अनुकरणी होऊन आपण इंग्लंडच्या पद्धतीची नक्कल उठविण्याची खटपट केली आहे परंतु आपणाजवळ शक्ति नाहीं. आणि आतां जे त्याहीपेक्षां अधिक उद्योगशील आहेत अशा जपानी लोकांच्या पद्धतीची नक्कल आपण उठवूं गेलो तर आपणाला अधिक यश येण्याचा संभव आहे काय? युरोपीय विज्ञान ज्या ज्ञानाला प्रसवतें ती एक प्रचंड शक्ति आहे. चंड पुरुषानें हातांत धारण कर-ण्याचें तें शस्त्र आहे. ती भीमसेनाची गदा आहे. कोणी एकादा दुर्बल ती वापरण्याच्या प्रयत्नांत स्वतःला चिरडून टाकण्यापलीकडे काय करील?

## शक्तीच्या अभावीं आमची भक्ति जगूं शकणार नाहीं.

उणीव कसली आहे तर मग? प्रेम? उत्साह? भक्ति? हीं तर भारतीय स्वभावांत भिनलेलीं आहेत. परंतु शक्तीच्या अभावीं आम्हाला एककेंद्रीकरण साधत नाहीं. इतकेंच काय आपण तिचे संचलन करूं शकत नाही वा तिचें रक्षण करूं शकत नाहीं. भक्ति ही धडधडती ज्वाला आहे, तर शक्ति हें इंधन आहे. जर इंधन अपुरें असेल तर अग्नि किती वेळ तग धरील?

कर्मानें लाभणाऱ्या चंडशक्तीचें दान मिळालेली, संयम प्राप्त झालेली, आणि ज्ञानानें प्रज्वलित झालेली बलवान प्रकृति जेव्हां प्रेम आणि पूज्यभाव यांनीं युक्त होऊन परमेश्वरा-सन्मुख उभी ठाकते तेव्हां ती भक्ति चिरंजीव होते आणि दैवी तत्वाशीं सदा आत्म्याला

निगडीत करून ठेवते. परिपूर्ण भक्ति ही एक महान् वस्तू आहे आणि तिचा आवेग सहन करणें दुर्बल प्रकृतीच्या आवांक्यापलीकडचें असतें. क्षणभर तिचें उत्थान होतें आणि तिची ज्वाला स्वर्गाला जाऊन भिडते. पण प्रकृति हतबल होऊन मागें पडते आणि पूर्वीपेक्षा दुर्बल होते. ज्यांत केवळ उत्साह आणि पूज्यभाव हेच जीवभूत असतात असा प्रत्येक प्रयत्न अपयशी झालाच पाहिजे आणि जोंवर या प्रयत्नाला कारणीभूत होणारें मानवी साहित्य दुर्बल आणि सत्वानें हलकें आहे तोंपर्यंत तें स्वतःच जळून गेलें पाहिजे.

## म्हणून भारताला केवळ शक्तीची जरूरी आहे.

जों जों आपण खोलवर विचार करूं तों तों आपली श्रद्धा बळावत जाईल कीं, जी एक उणीव सर्वाआधीं आपण भरून काढली पाहिजे ती म्हणजे शक्ति होय——भौतिक शक्ति, मानसिक शक्ति, नैतिक शक्ति. परंतु सर्वांहून वरिष्ठ, अनंत, अविनाशी, सर्वमूल अशी आध्यात्मिक शक्ति होय. जर आपणाजवळ शक्ति असेल तर आपणाला प्रत्येक इतर वस्तू सहज आणि वस्तुगत्या जोडतां येईल. शक्तीच्या अभावीं आपण स्वप्न पुरुषाप्रमाणें आहोत. हात आहेत पण धरतां किंवा मारतां येत नाहीं, पाय आहेत परंतु धावतां येत नाहीं.

## इच्छाशक्तींत वृद्ध आणि अपंग झालेल्या भारताला पुनः जन्म द्यावयाचा आहे.

जेव्हां आपण एकाद्या कार्यास आरंभ करतो त्यावेळीं उत्साहाचा पहिला पूर ओसरला म्हणजे आपण एका मरगळणाऱ्या असमर्थतेच्या स्वाधीन होतो. वयानें आणि अनुभवानें वृद्ध झालेल्या लोकांच्या संबंधांत आपण नेहमी असें पहातो कीं, अतिरिक्त ज्ञानसंचयामुळें त्यांची क्रियाशक्ति आणि इच्छाशक्ति हीं गोठून जातात. मग जेव्हां एखादी मोठी गरज अंगावर येऊन पडते आणि त्या टोचणीमुळें कांहीं क्रिया करणें भाग पडतें त्यावेळीं ते थबकतात, विचार मग्न होतात, चर्चा करतात, कांहीं कच्चे प्रयत्न करतात किंवा ते सोडून देतात आणि एखादा सोपा आणि सुरक्षित मार्ग आपोआप सुचेल म्हणून वाट पहातात. परंतु अत्यंत सरळ मार्गानें जात नाहींत. याचा परिणाम असा होतो कीं, ज्यावेळीं कांहीं करणें शक्य आणि आवश्यक असते ती वेळ निघून जाते. आपल्या भारतीय वंशाची अवस्था अगदीं तंतोतंत वरील वृद्धपुरुषाप्रमाणें झाली आहे. ज्ञानाचा मोठा संचय संग्रहीं आहे, भावना आहेत, इच्छाशक्ति आहे. परंतु म्हातारपणचें जाडय, वार्धक्यांतील भितरटपणा आणि दुर्बलता यांनी तो मरगळून गेला आहे. भारताला जर जिवंत राहावयाचें असेल तर पुन्हा त्याला तरुण केलें पाहिजे. फोफावून आणि गर्जून चालणारे उत्साहाचे प्रवाह भारतावर सोडले पाहिजेत आणि प्राचीन काळीं जसा, तसा त्याचा आत्मा विशाल, बलशाली, इच्छे-प्रमाणें शांत किंवा क्रोधी होणारा, क्रिया अथवा शक्ति यांचा केवळ लहरून गेलेला समुद्रच जणूं, बनला पाहिजे.

## भारताचा पुनर्जन्म होणें शक्य आहे.

आमच्यापैकीं पुष्कळांच्या तोंडून त्यांना जड दैत्यानें म्हणजेच निष्क्रियतेच्या काळ्याकुट्ट तमानें सर्वथा ग्रासल्यामुळें असे उद्गार सांप्रत निघत असतात कीं, हें अशक्य आहे. भारत आतां क्षीण झाला आहे. निःशक्त आणि निष्प्राण झाला आहे, इतका कीं, त्याचा पुनर्जन्म होणें शक्य नाहीं. आपल्या वंशाचा विलय होणें हें आतां टळत नाहीं. परंतु असें म्हणणें मूर्खपणाचें आणि व्यर्थ आहे. तशीच कोणाची इच्छा असल्याशिवाय कोणतीही व्यक्ति किंवा राष्ट्र यांनी दुर्बल रहाण्याचें कारण नाहीं आणि जाणून बूजून क्षयाची वाट चालण्याचे ठरविल्याशिवाय कोणी व्यक्ति किंवा राष्ट्र यांनीं नष्ट होण्याचें कारण नाहीं.

## राष्ट्र म्हणजे त्यांतील कोटी कोटी जनांची शक्ति.

कारण राष्ट्र म्हणजे काय ? आमची मातृभूमी म्हणजे काय ? मातृभूमी म्हणजे कांहीं मातीचा तुकडा नव्हे किंवा भाषेचा अलंकार नव्हे किंवा मनाची कल्पना नव्हे. मातृभूमी ही प्रचंड शक्ति आहे. राष्ट्रांतील कोटयवधी घटक प्रजांची शक्ति मिळून ती बनली आहे, कोटचवधी देवता एका शक्तींत एकत्रित येऊन त्यांच्या ऐक्यांतून भवानी महिषमर्दिनी जशी प्रगट झाली त्याप्रमाणें ज्या शक्तीला आम्ही भारत म्हणतो ती भवानी भारती तीस कोटी प्रजांच्या शक्तीचें जितें जागतें असें एक स्वरूप आहे. परंतु ती निष्क्रिय आहे. तमाच्या भारलेल्या वर्तुळांत ती बांधलेली आहे. स्वैकनिष्ठ तमानें, निष्क्रियतेनें आणि अज्ञानानें तिच्या लेकरांना घेरलें आहे. मात्र तमापासून सुटण्यासाठीं आंतील ब्रह्माला आपण जागें केलें पाहिजे.

## राष्ट्र निर्माण करणें किंवा नष्ट होणें आपल्या इच्छेवर अवलंबून आहे.

कैक सहस्रावधी पुण्य पुरुषांनी, साधूंनी आणि संन्याशांनी आपल्या चरित्रानें न बोलतां आपणास काय उपदेश दिला आहे ? भगवान् रामकृष्ण परमहंस यांच्या विभूति द्वारां कोणता संदेश प्रगट झाला आहे ? सिंह सदृश हृदयाच्या विवेकानंदांच्या जगताला हलवून सोडण्याच्या वाग्विलासांतील गाभा कोणता आहे बरे ? तर तो हा कीं, तीस कोटी लोकांतील प्रत्येकाच्या हृदयांत, मग तो सिंहासनावर बसलेला राजा असो किंवा कष्ट करीत असलेला एकादा भारवाहक असो अथवा आपल्या संध्येंत मग्न झालेल्या ब्राह्मणापासून तो मनुष्यांपासून दूर ढकललेल्या पंचमा पर्यंत कोणी असो परमेश्वर जीवमान आहे.

आपण सर्व देवता आहोंत, निर्माते आहोंत. कारण आपल्याठायीं ईश्वरी चित्शक्ति आहे. आणि जीवन म्हणजे निर्मिती आहे. नवीन आकार जन्मास घालणें म्हणजेच कांहीं निर्मिति नव्हे. संरक्षण हें देखील निर्मितीच आहे. प्रत्यक्ष नाश म्हणजे निर्मितीच होय. काय निर्मिती करावी हें आपणावर अवलंबून आहे. कारण आपण केवळ देव आणि

माया यांच्या आधीन झालेल्या बाहुल्या नव्होत. आपण सर्व शक्तिमान समर्थाचे आविष्कार आहोंत, त्याचे पैलू आहोंत.

## हिंदुस्थानचा पुनर्जन्म झालाच पाहिजे कारण तशी जगाच्या भविष्यकालाची मागणी आहे.

भारताचा नाश होणें शक्य नाहीं. आपला वंश नष्ट होऊं शकणार नाहीं कारण मनुष्य मात्रांचे जे निरनिराळे विभाग आहेत त्यांत फक्त भारतासाठींच अत्युच्च आणि मोठें वैभवशाली भविष्य राखून ठेवलेलें आहे. मनुष्य जातीच्या भविष्याला त्याची अत्यंत आवश्यकता आहे. यच्चयावत् जगताचा भविष्यकालीन धर्म हा भारतानें प्रगट केला पाहिजे—असा शाश्वत धर्म कीं, जो सर्व विज्ञान आणि तत्वज्ञान यांमध्यें संवाद घडवून आणील आणि अशा-रीतीनें सर्व मानव एकात्म करील. त्याचप्रमाणें नीतीच्या क्षेत्रांत सर्व मानवतेंतून म्लेंच्छत्वाचा निचरा करणें, जगाला आर्यत्वाची दीक्षा देणें हें त्याचें नियत कार्य आहे हें साध्य करण्यासाठी प्रथम भारतानें आर्यत्वाची दीक्षा पुन्हा घेतली पाहिजे.

एकाद्या मानववंशाच्या वांटचाला आलेलें अत्यंत मोठे आणि अत्यंत आश्चर्यकारक असें हें कार्य भारताच्या वाटंचाला आलेलें आहे. आणि या महान कार्याचा शुभारंभ करण्यासाठीं म्हणून भगवान् रामकृष्णांचें येणें झालें आणि विवेकानंदांनी उपदेश केला. एका काळीं चिह्लें दिसत होतीं त्याप्रमाणें जर या कार्याची प्रगति घडून आली नसेल तर त्याचें कारण म्हणजे आपण पुन्हां आपल्या आत्म्यावर तमाच्या भयानक मेघाला, भीति, संशय, चांचल्य, आलस्य या सर्वांना आरूढ होऊं दिलें आहे. आपणांपैकीं कित्येकांनी एकापासून निघालेल्या भक्तीचें ग्रहण केलें आहे आणि दुसऱ्यापासून निघालेल्या ज्ञानाचें ग्रहण केलें आहे. परंतु शक्तीच्या आणि कर्माच्या अभावीं आपल्या भक्तीला एक जितीजागती वस्तू आपण बनवूं शकलों नाहीं. आपण अद्यापही लक्षांत घ्यावें कीं, रामकृष्णांनी जी उपासना केली आणि जिच्याशीं ते एकरूप झाले ती काली होती, तीच भवानी, तीच शक्ति माता.

परंतु भारताचें भविष्य आतां कोणा व्यक्तींच्या दोषांसाठीं आणि उणीवांसाठीं वाट पहात बसणार नाहीं. मातेची आज्ञा आहे कीं माणसानें उठावें तिची उपासना करावी आणि ती विश्वव्यापक करावी.

## शक्ति मिळविण्यासाठीं आपण शक्तिमातेची पूजा केली पाहिजे.

तर मग शक्ति, पुन्हा शक्ति, आणखी पुन्हा शक्ति हीच आमच्या वंशाची गरज आहे. आपणाला शक्ति पाहिजे पण शक्ति-मातेचें पूजन जर आपणाला करतां आलें नाहीं तर तें कसें घडेल ? माता पूजेची मागणी करीत आहे ती स्वतःसाठीं नाहीं, परंतु आपणाला साहाय्य व्हावें आणि आपणाला तिनें स्वतःला देऊन टाकावें यासाठीं आहे. ही कांही भ्रमिष्टाची कल्पना नव्हे. हा लोकभ्रम नव्हे. परंतु हा जगाचा एक साधा नियम आहे. त्यांची

इच्छा असली तरी याचना केल्याशिवाय देवता स्वतःचें दान करीत नाहींत. तें शाश्वत सुद्धां माणसांकडे नकळत येत नाहीं. प्रत्येक सद्भक्ताला अनुभवानें हें ज्ञात आहे कीं, दैवी आत्मा आपलें अविनाशी सौंदर्य आणि ब्रह्मानंद यांचा आत्म्यावर वर्षाव करण्यापूर्वी आपण त्याच्याकडे वळलें पाहिजे आणि इच्छापूर्वक त्याला भजलें पाहिजे. शाश्वताविषयीं जें खरें आहे तेंच त्या शाश्वत पुरुषापासून निघालेल्या मातेबद्दल ही खरें आहे.

## धर्म हाच सत्य पंथ होय.

पाश्चिमात्य कल्पनांनी भारून गेल्यामुळें प्राचीन, जुन्या शक्तींच्या उगमाकडे परत जाण्याच्या उपदेशाकडे जरा तिरक्या नजरेनें जे पहातात, त्यांनीं कित्येक मूलभूत गोष्टींचा विचार करावा.

## जपानचें उदाहरण

१. राष्ट्रामध्यें शक्तीचा एकाएकी आणि विलक्षण असा उद्रेक झाल्याचें आधुनिक जपान-सारखें उदाहरण इतिहासांत दुसरें नाहीं. या उद्रेकाची उपपत्ति लावण्यासाठीं अनेक कल्पना पुढें मांडण्यात आल्या आहेत. परंतु या प्रचंड जागृतीचें मूळ झरे कोणचे, या अक्षय्य शक्तीचे उगम कोणचे या विषयीं आतां बुद्धिजीवी जपानीच आपणास सांगूं लागले आहेत कीं, या सर्वांचा उगम धर्मापासून आहे. ओयोमी यांच्या वेदान्ती शिक्षणांतून आणि ज्या राष्ट्रशक्तीचे प्रतिबिंब मिकॅडोच्या विभूतींत सांठविलेलें आहे त्या शक्तीच्या पूजनासह शिंतो धर्माचा जो पुनरुदय झाला त्यानेंच या लहानशा बेटावरील साम्राज्याच्या अंगीं पाश्चिमात्य ज्ञान आणि विज्ञान या प्रचंड शस्त्रांना लीलेनें पेलण्याचें सामर्थ्य दिलें आणि जसें अर्जुनानें गांडीव धनुष्य लीलेनें आणि अजिंक्य आवेशानें धारण केलें त्याप्रमाणें ते त्यांनी पेललें.

## आध्यात्मिक पुनरुज्जीवनाची भारताची अधिक गरज.

२. जपानला कधीं पडली नसेल इतकी धर्माच्या स्रोतांपासून कांहीं ग्रहण करण्याची गरज भारताला आहे. जेथें पूर्वीं शक्तीचें अस्तित्वच नव्हतें तेथें आपणास शक्तीचें सर्जन करावयाचें आहे. आपली प्रकृतीच बदलावयाची आहे आणि तेणें करून आपणांस नवीन हृदयाचीं नवीन माणसें बनावयाचें आहे. आपणांला पुन्हा जन्म घ्यावयाचा आहे. याला एकादा शास्त्रीय मार्ग किंवा पद्धत नाहीं. त्यासाठीं कांहीं यंत्रयोजना नाहीं. आत्म्याचा जो अक्षय्य आणि आंतरिक संचय आहे त्यांतूनच उचल करून शक्ति उत्पन्न करतां येईल. म्हणजेच शाश्वताची जी आद्यशक्ति, जी सर्व नूतन अस्तित्वाचें बीज आहे तींतून उत्पन्न करतां येईल. पुनर्जन्म म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून आपल्या ठायीं असलेल्या ब्रह्माचें पुनरुज्जीवन होय. हा एक आध्यात्मिक मार्ग आहे. शारीरिक अथवा बौद्धिक प्रयत्न यांच्या आंवाक्यापलीकडील आहे.

## राष्ट्रीय मानसाचें स्वाभाविक मार्ग म्हणजे धर्म

३. भारतामध्यें जेवढ्या महान जागृति झाल्या, अत्यंत प्रचंड आणि अत्यंत विविध बलांनी युक्त असे जे भारताच्या आयुष्यांतील कालखंड झाले, त्या सर्व प्रसंगीं कोणच्यातरी खोल अशा धार्मिक जागृतीच्या स्रोतांतूनच त्यांना जीवन मिळालें आहे. जेथें ही धार्मिक जागृति परिपूर्ण आणि भव्य अशी झाली तेथें तिनें उत्पन्न केलेली राष्ट्रीय शक्ति हीही प्रचंड आणि वीर्यशील झाली. आणि जेथें ही धार्मिक जागृति संकुचित आणि अपरिपूर्ण अथवा किंचित् कालीक झाली तेथें राष्ट्रीय जागृति मोडून पडली, अपुरी राहिली किंवा कच्ची ठरली. या चमत्काराचें पौनः पुन्य हेंच दर्शवितें कीं, या वंशाच्या स्वभावाच्याच ती अंगभूत झाली आहे. तुम्ही जर दुसऱ्या आणि परकीय पद्धतींचा अवलंब कराल तर आपणाला कदाचित यश आले तरी तें अत्यंत कंटाळवाण्या मंदगतीनें, अत्यंत दुःखानें आणि अपरिपूर्ण असें येईल. किंवा कदाचित आपल्याला तें मुळींच मिळणार नाहीं. आपणच मळलेल्या अगदीं पुसट आणि वळणावळणाच्या मार्गांनी जाण्याचें पत्करण्यापेक्षां परमेश्वरानें आणि मातेनें जो मार्ग आपल्यासाठीं योजून ठेवला आहे तो सरळ मार्ग आपण कां सोडावा ?

## अंतस्थित आत्मा हाच शक्तीचा खरा स्रोत आहे.

आत्मिक शक्तीचा एकमेव अदृश्य सागर असें जें अंतर्गत ब्रह्म त्यापासूनच सर्व भौतिक आणि मानसिक जीवन उद्भूत होतें. पूर्वेकडे प्राचीन काळीं हा सिद्धांत जितका मान्य झाला होता तसाच तो आतां प्रमुख पाश्चिमात्य लोकांतही मान्यता पावण्यास प्रारंभ होऊं लागला आहे. असें जर आहे तर मग आध्यात्मिक शक्ति हीच इतर सर्व शक्तींचें मूळ आहे. सखोल आणि अक्षय्य असे ते उगम, आणि अनंत असे ते जलोद्रेक विद्यमान आहेत. जमिनीवरील उथळ झरे गांठण्यास सुलभ असतात पण ते लवकरच शुष्क होतात. मग वरवर उकराउकरी करण्यापेक्षां खोल कां जाऊं नये ? हातीं पडणाऱ्या फळानें श्रमांची भरपाई होईल.

## गरजेच्या तीन गोष्टी.

तीन मूलभूत नियमांना धरून आम्हाला तीन गोष्टी पाहिजेत.

१. भक्ति.——मातेचें मंदिर. शक्तिमातेचें पूजन केल्याशिवाय आपणाला शक्तिचा लाभ होणार नाहीं. म्हणून आपण भारताची माता, शक्तिमाता, श्वेत भवानी हिच्यासाठी एक मंदिर बांधू या. आधुनिक शहरांच्या संसर्गापासून दूर आणि शांत, एकांत आणि शक्ति यानीं परिपूरित अशा उच्च आणि शुद्ध वातावरणांत जेथें मानवानें अद्याप क्वचितच पदप्रक्षेप केलेला आहे अशा जागीं हें मंदिर उभारूं या. हें मंदिर म्हणजे एक तिच्या पूजेचें केंद्र होईल आणि तो प्रवाह सर्व देशभर वहात राहील. कारण तेथें पर्वतांत पूजन झालेली ती माता पुढें अग्निसारखी आपल्या पूजकांच्या मस्तकांत आणि हृदयांत जाऊन भिडेल. मातेनें या प्रमाणें आज्ञा देखील केलेली आहे.

**२. कर्म—ब्रह्मचाऱ्यांचें नवें दल.**

कर्मामध्यें रूपांतरित केल्याशिवाय पूजन हें मृत आणि निष्परिणामी ठरेल.

म्हणून आम्ही एक मठ स्थापूं आणि त्या मंदिराला जोडून एक कर्मयोग्यांचें दल काढूं. ज्यांनीं आपल्या सर्वस्वावर पाणी सोडलें आहे, मातेची कांहीं सेवा घडावी अशी ज्यांची इच्छा आहे अशा कांहींना परिपूर्ण संन्यास देण्यांत येईल. कांहींची जर तशी इच्छा असेल तर त्यांनी संपूर्ण संन्यासी व्हावें. पण त्यांतील पुष्कळसे ब्रह्मचारी राहतील आणि जेव्हां त्यांच्याकडे दिलेलें काम संपेल त्यावेळीं ते गृहस्थाश्रमाकडे परत येतील. मात्र त्यांनी पूर्णतया त्यागाचा स्वीकार केला पाहिजे.

**कां ? या कारणांसाठीं :**

१. आपल्यामध्यें आत्मिक शक्तीचा जो सागरसांठा आहे तिकडे परत वळावयाचें असल्यास आपण आपली शारीरिक इच्छा आणि आकांक्षा यांत आधींच गुरफटून पडण्यापेक्षां आपण जितक्या प्रमाणांत त्यांना दूर ठेवूं आणि वैषयिक सुखानुभव, अतिरिक्त भोगेच्छा, असोशि (अनिवार इच्छा) आणि या भौतिक जगतांतील बहुतेक जाडयें यांपासून जितक्या प्रमाणांत आपण दूर राहूं त्या प्रमाणांतच परत वळणें शक्य होतें.

२. शक्तिच्या विकासासाठीं संपूर्णतया एकचित्तता आवश्यक आहे. ज्याप्रमाणें भाला हा लक्ष्यावर केंद्रित करावा लागतो त्याप्रमाणें आपलें मन हें सर्वस्वीं तिकडे लावलें पाहिजे. दुसरी काळजी किंवा ओढ यांनी मनाला जर व्यत्यय घडला तर ज्याप्रमाणें भाला हा आपल्या सरळ मार्गातून च्युत होईल आणि आपलें लक्ष्य तो चुकेल त्याप्रमाणें घडेल. ज्यांच्याठायीं शक्तिचा आत्यंतिक विकास झाला आहे आणि ज्यांच्या स्वतःमध्यें त्यांच्या व्यक्तीत्वांतील कोपरा अन् कोपरा तिनें व्यापून बाहेरील पृथ्वीला श्रीमंत करण्यासाठीं ज्यांच्यातील शक्ति प्रवाहित होत आहे अशा माणसांचा एक गट आम्हास पाहिजे आहे. ही मंडळी त्यांच्या अंतःकरणांत आणि डोक्यांत भवानीचा अग्नि प्रज्वलित झाल्यानें, जिकडे जातील तिकडे आमच्या भूमीच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांतून ही ज्वाला घेऊन जातील.

**३. महान् संदेश—ज्ञान**

भक्ति आणि कर्म हीं जोंपावेतो ज्ञानावर अधिष्ठित नाहींत तोपर्यंत त्याना पूर्णत्व व चिरंजीवित्व लाभणार नाहीं. यास्तव आमच्या ब्रह्मचारी दलांतील ब्रह्मचाऱ्यांना आत्मज्ञानसंपन्न करण्याविषयीं शिकविलें जाईल आणि आपलें सर्व कार्य खडकावर उभारावें त्या प्रमाणें भक्कम पायावर अधिष्ठित करण्यास सांगितलें जाईल. त्यांच्या ज्ञानाचा आधार काय असेल ? सोऽहं या वेदांतांतील प्रभावी महामंत्राशिवाय दुसरा काय असणार ? हें प्राचीन धर्मसूत्र लोकांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन अद्यापि पोचावयाचें आहे. कर्म आणि भक्ति यांच्या योगानें हें ज्ञान जेव्हां सजीव होईल त्यावेळीं तें माणसाची भीतीपासून आणि दुर्बलतेपासून मुक्तता करील.

# मातेचा सन्देश

म्हणून जेव्हां तुम्ही प्रश्न करतां कीं भवानी माता कोण आहे तेव्हां प्रत्यक्ष भवानीच तुम्हाला उत्तर करते "तुमच्यांतील शाश्वतापासून आणि जगतांतील शाश्वतापासून निघून जी खळाळते ती अनंत शक्ति मी आहे. मी विश्वमाता आहे. मी लोकमाता आहे. आणि आर्यभूमीची या मातींतून उद्‍भवलेली आणि तिच्या सूर्यानें आणि वाऱ्यानें पोसलेलीं अशीं पवित्र भूमीची जीं तुम्हीं लेकरें आहां त्यांची मी माता आहे, मी भारती भवानी आहे."

"मग जर तुम्ही असा प्रश्न कराल कीं या भवानी मातेसाठीं आम्ही मंदिर कां उभारावें तर ऐका तिचें उत्तर—'कारण मी तशी आज्ञा केली आहे.' आणि दुसरें कारण भविष्य-कालीन धर्माचें केंद्र निर्माण करून तुम्ही त्या शाश्वताची निकडीची इच्छा संवर्धित कराल आणि तेणेंकरून पुण्यसंचय करून या जन्मांत बलिष्ठ व्हाल आणि पुढील जन्मांत मोठे व्हाल. आज तुम्ही एक राष्ट्र निर्माण केलें असें होईल आणि जगताला आर्यत्वाची दीक्षा देण्यासाठीं एका युगाचें संघठन कराल. तें राष्ट्र म्हणजे तुमचें स्वतःचेच राष्ट्र आहे. तें युग म्हणजे तुमची लेकरें किंवा पुत्र पौत्र यांचेंच युग होय. आणि तें जगत् म्हणजे समुद्रांनी आणि पर्वतांनी मर्यादित केलेला असा पृथ्वीचा तुकडा नसून तें जग म्हणजे सर्वत्र गजब-जलेल्या लक्षावधी लेकरांनी व्याप्त झालेली समग्र पृथ्वी होय."

"तर मग, पुढें या आणि ऐका ती मातेची आज्ञा. वास्तविक ती तर आपल्या हृदयांत अगोदरच बसलेली आहे आणि तेथें ती प्रगट होण्याची संधी पहात आहे. तुमच्याकडून पूजा होण्याची ती अपेक्षा करीत स्तब्ध बसलेली आहे. कारण आपल्यांतील ईश्वर तमानें झांकलेला आहे, निष्क्रियतेनें पीडित झालेला आहे. ती दुःखी आहे कारण तिची लेकरें मदतीसाठीं तिला पाचारण करीत नाहीत. अंतर्यामींच्या खळबळीनें तिचें अस्तित्व तुम्हाला जाणवत आहे. तुम्ही स्वचा काळा बुरखा फेकून द्या. जाडयाच्या कैदखान्याच्या भिंती फोडून टाका आणि तुम्हांपैकी प्रत्येकाला अंतःप्रेरणा होईल त्यासरशी तुमच्या शरीरानें किंवा तुमच्या बुद्धीनें किंवा तुमच्या वाणीनें किंवा तुमच्या धनानें किंवा तुमच्या प्रार्थनांनी किंवा पूजनानें आपल्या शक्ति-प्रमाणें तिला साहाय्य करा. माघारी परतूं नका. कारण ज्यांना तिनें पाचारण केलें आणि ज्यानीं तिचें म्हणणें एकलें नाही त्यांच्या विरुद्ध तिच्या आज्ञाकाळांत तिचा रोष होईल तर उपाय नाहीं. परंतु जे तिच्या येण्याचें, किंचित कां होईना, स्वागत करतील त्यांना आपल्या मातोश्रीच्या तोंडावर दयेचें आणि सौंदर्याचें तेज प्रकाशलेलें दिसेल."

# पुरवणी

नूतन संन्यासी दलाचे काम आणि नियम स्थूल मानानें येणेंप्रमाणें असतील.

### १. साधारण नियम :—

१. मातेसाठीं जे ब्रह्मचर्यजीवनाचा आश्रय करतील त्यांना चार वर्षेपर्यंत तिची सेवा

करण्याचें व्रत स्वीकारावें लागेल. तदुत्तर वाटल्यास त्याना तेंच काम पुढें चालवितां यईल किंवा आपल्या कुटुंब जीवनाकडे वळतां येईल.

२. मातेच्या नांवानें जें कांहीं द्रव्य त्याना प्राप्त झालें असेल तें मातेच्या सेवेच्या कारणी लागेल. त्यांच्या स्वतःसाठीं त्याना जेव्हां जरूर असेल तेव्हां भोजनपान आणि आश्रय मिळेल. अधिक कांहीं मिळणार नाही.

३. स्वतःसाठीं म्हणून ते जें कांहीं मिळवतील-उदाहरणार्थ पुस्तक प्रकाशन द्वारां—त्यांतील निदान अर्धा भाग त्यानी मातेच्या सेवेला दिला पाहिजे.

४. या कार्याशीं किंवा आपल्या धार्मिक जीवनाविषयीं संबंध असलेल्या सर्व गोष्टीत दलाच्या प्रमुखाशीं किंवा त्याच्या एक अगर दोन साहाय्यकांशीं संपूर्ण आज्ञाधारकपणा पाळला पाहिजे.

५. दलाच्या प्रमुखानें घालून दिलेले शारीरिक आणि मानसिक शुद्धीचे आणि आचाराचे नियम आणि पद्धति अगदीं कडकपणानें पाळल्या पाहिजेत.

६. विश्रांतीसाठीं त्याचप्रमाणें धार्मिक प्रगतीसाठीं वेळकाळ नेमून दिला जाईल आणि त्यावेळीं त्याना मठांत रहावें लागेल परंतु वर्षातील अधिकांश काळ त्याना बाहेर कामाला वेंचावा लागेल. केवळ मंदिराच्या सेवेसाठीं आणि कार्याच्या मध्यवर्ती संचलनासाठीं ज्या थोडयांची गरज लागेल तेवढे सोडून सर्वांना हा नियम लागू होईल.

७. कार्यकर्त्यांच्यामध्यें उच्चनीच पदवीचे भेद रहाणार नाहीत आणि कोणीही सन्मानाची किंवा वैयक्तिक प्रसिद्धीची इच्छा करूं नये. पण सर्वांनी शक्तिची उपासना करावी आणि स्वतःला विसरावें.

## २.लोकांसाठीं नेमलेलें काम

८. त्यांचें मुख्य कार्य म्हणजे जनता शिक्षण आणि गरीब व अज्ञ याना सहाय्य करणे हें राहील.

९. वरील हेतू साध्य करण्यासाठीं त्यांनी खालीलप्रमाणे झटावें.

1. अशिक्षितांच्या बुद्धीला झेंपेल अशीं व्याख्यानें आणि प्रदर्शनें.
2. वर्ग आणि रात्रीच्या शाळा.
3. धार्मिक उपदेश.
4. रुग्णशुश्रूषा.
5. धर्मबुद्धीनें योजिलेलीं कामें चालविणें.
6. त्यांच्या हाताला जें कोणतेंही चांगलें कार्य येईल तें आणि दल जें पसंत करील तें कोणतेंही कार्य करणें.

## ३. मध्यम वर्गाकरितां कामें

१०. ज्या प्रमाणें आज्ञा होईल त्याप्रमाणें कार्य करीत रहावें. लोकोपयोगी अनेक कामें, मध्यम वर्गाचें शिक्षण आणि धार्मिक जीवन, त्याचप्रमाणें त्यांच्या अनेक सार्वजनिक गरजा या संबंधींची कामें जीं मोठया शहरांतून आणि अन्यत्र नेहमींच असतात अशीं कामें करीत राहणे.

## ४. श्रीमान् वर्गासाठीं कामें

११. त्यानी जमिनदार, भूमिपति, आणि श्रीमंत याना साधारणपणें गांठावें आणि असा प्रयत्न करावा.

१. जमीनदार आणि शेतकरी कुळें यांमध्यें स्नेहभाव नांदविणें आणि सर्व तंटेबखेडे वारणें.

२. एका जित्या जागत्या धार्मिक तत्वाची एक सांधे जुळविणारी सांखळी तयार करणें आणि सर्व वर्गांमध्यें एका मोठया ध्येयाविषयीं एक सर्वसाधारण आतुरभावना उत्पन्न करणें.

३. आपापल्या परिसरांतील लोकांकडे सार्वजनिक उपयोगाच्या कार्यासाठीं धर्म करण्याच्या बुद्धीकडे श्रीमंत माणसांचीं मनें वळविणें. कोणत्याही प्रकारचा सरकारी बहुमान अथवा पारितोषकाची आशा राखूं नये.

## ५. देशासाठीं साधारण कार्य

१२. द्रव्याची सोय होतांच कित्येकांना फायद्याच्या कला आणि उत्पादन यांबाबत अभ्यास करण्याकरितां परदेशीं पाठविलें जाईल.

१३. या अभ्यासाच्या काळांत ते संन्याशीच राहतील. आणि शुद्धतेच्या आणि आत्म विसर्जनाच्या आपल्या सवयींचा आधार कधीही सोडणार नाहींत.

१४. देशीं परत आल्यावर आपल्या दलाच्या सहाय्यानें ते कारखाने आणि कार्यखाने, संन्याशी जीवन व्यतीत करतानाही, स्थापन करतील आणि जेवढा नफा मिळेल तेवढा सर्व अधिक अधिक विद्यार्थी परदेशी पाठविण्यासाठीं ते खर्च करतील.

१५. इतरांना अनेक परदेशांतून पायीं चालत पाठविण्यांत येईल. यायोगें ते आपल्या जीवनानें, आपल्या वागणुकीनें आणि आपल्या बोलण्यानें युरोपीय राष्ट्रांच्याठायीं भारतीय लोकांविषयीं प्रीति आणि सहानुभूति निर्माण करतील आणि तिकडील लोकांना आर्यध्येयांचा स्वीकार करण्याचा पाया घालून ठेवतील.

मंदिर बांधून झाल्यावर आणि त्याची प्रतिष्ठा झाल्यावर दलाच्या कार्याचा विकास शक्य तितक्या द्रुत गतीनें आणि जनता जेवढी सहानुभूति आणि पाठिंबा देईल त्यावेगानें साधण्यांत येईल. मातेच्या आशीर्वादानें आपणाला अपयश येणार नाहीं.

—श्रीअरविंद

SABCL Vol 01 : Page 61

हे प्रभो, जें जें कांहीं आहे, व जें जें कांहीं होणार आहे, त्या सर्वांच्या अंतर्यामीं खोल तुझेंच दिव्य व निरंतरचें स्मित आहे.

—श्रीमाताजी

# अनुभव आणि दृष्टांत

**प्र०**–पूर्णयोगाच्या दृष्टीनें 'एकाग्रता' व 'ध्यान' यांत काय फरक?

**उ०**–जेव्हां एकाद्या विशिष्ट अवस्थेंत (उदाहरणार्थ–शान्तीत) अथवा एकाद्या आंतरिक मनोव्यापारांत (उदाहरणार्थ, आकांक्षा, संकल्प, मनानें मातृसान्निध्याची भावना करणें, नामस्मरण करणें) जाणीव सुस्थिर झालेली असते तेव्हां त्याला या योगाच्या दृष्टीनें 'एकाग्रता' म्हणावयाचें; आणि योग्य ज्ञान प्राप्त व्हावें म्हणून जेव्हां अंतर्मन घटनांचें अवलोकन करीत असतें तेव्हां त्याला 'ध्यान' म्हणावयाचें.

**प्र०**–'श्रीमाताजी त्यांच्या अंतरंगांत नित्य 'एकाग्र-चेतनेंत' असतात' असें आपण लिहिलें आहे. ही 'एकाग्र-चेतना' म्हणजे काय?

**उ०**–ही 'एकाग्र-भूत' चेतना उच्चतर चेतना असते. ती दिव्य एकत्वांत आणि दिव्य संकल्प परिपूर्ण करण्याच्या कार्यांत केंद्रित झालेली असते; सामान्य माणसाची चेतना एकाद्या मानसिक कल्पनेच्या वा प्राणिक वासनेच्या किंवा देहाच्या गरजेच्या परिपूर्तीसाठीं सैरावैरा धांवत असतें आणि विखुरलेली असते. ही एकाग्र चेतना नसते. त्याचप्रमाणें असंख्य आगंतुक विचार, भावना नि प्रेरणा यांचें आक्रमणहि पण तिच्यावर होत नसते; तर ती चेतना स्वतःची स्वामिनी, केंद्रित नि सुसंवादयुक्त असते.

**प्र०**–यशस्वी ध्यानाची खूण काय?

**उ०**–गंभीरतर किंवा उच्चतर चेतनेंत प्रवेश करणें अथवा ती गंभीरतर किंवा उच्चतर चेतनाच स्वतःच्याठिकाणीं अवतरणें—हें ध्यानांत यश आल्याचें खरें लक्षण.

**प्र०**–ध्यानाखेरीज उच्च उच्चतर पातळीवरील अनुभूति प्राप्त होणें अशक्य आहे, हें खरें आहे काय?

**उ०**–थोडयाशा ध्यानाच्या मदतीनें तें अधिक सोपें जातें; तथापि ध्यान कधींहि न करणाऱ्यांनाहि अनुभव मिळतात. तेव्हां 'अशक्य' म्हणण्यांत काय अर्थ?

**प्र०**–आसन घालून ध्यानास बसण्याचा ध्यानावर कांहीं परिणाम होतो काय?

**उ०**–प्राणिक शक्तींना अधिक बलवान् करण्यासाठीं विशेषतः त्यांना देहांत सुस्थिर करण्यासाठीं आसनाचा उपयोग होतो.

**प्र०**–साधनेंत प्रगति होत असतांना सर्व साधकांना सारख्याच प्रकारचे अनुभव नि साक्षात्कार होतात काय? का साधकांच्या स्वभावानुसार ते भिन्नभिन्न असतात?

**उ०**–सर्वांच्या बाबतींत समान अशा कांहीं गोष्टी असतात—सर्व अत्यावश्यक गोष्टी सर्व साधकांना सारख्याच शक्य असतात. मात्र प्रत्येक साधक स्वतःस शक्य असेल तें व शक्य असेल त्या पद्धतीनें स्व–स्वभावानुसार या गोष्टी विकसित करीत असतो.

**प्र०**–'अनुभूति', 'साक्षात्कार' आणि 'सिद्धि' यांमध्यें फरक काय?

**उ०**–योगमार्गावर असतांना जें जें घडतें त्या सर्वाला उद्देशून 'अनुभूति' हा शब्द वापरतात. मात्र ज्यावेळीं एकादा अनुभव स्थायी होतो त्यावेळीं त्याचें अनुभव हें स्वरूप रहात

नाहीं तर तो सिद्धीचें एक अंग बनून जातो. उदा० 'शांति', जेव्हां येते व जाते तेव्हां तो शांतीचा अनुभव व जेव्हां ती स्थिरपद होते, कायम होते व कधींच नाहींशीं होत नाहीं तेव्हां ती 'सिद्धि'. 'साक्षात्कारा' चें स्वरूप यांहून अगदीं वेगळें असतें. तुमची आकांक्षा जेव्हां प्रत्यक्षांत घडून येतें त्यावेळीं त्याला साक्षात्कार म्हणावयाचें. उदा० सर्वाभूतीं परमेश्वर वसत असतो अशी तुमची कल्पना असते. पण ती केवळ कल्पनाच अथवा विश्वासानें मानलेली गोष्ट असते. पण ज्यावेळीं भगवंताचें अस्तित्व सर्वांठायीं अनुभवास येतें अथवा दृष्टीस पडतें तेव्हां त्यास 'साक्षात्कार' म्हणावयाचें.

**प्र०**–'दृष्टांत' 'अनुभव' आणि साक्षात्कार यांत फरक काय ?

**उ०**–जेव्हां दिव्य प्रकाश दिसतो तेव्हां तो दृष्टांत, जेव्हां तुमच्यामध्यें प्रकाश प्रवेश करतो तेव्हां तो 'अनुभव,' आणि जेव्हां दिव्य प्रकाश तुमच्यामध्यें स्थिर होतो व त्यामुळें तुम्हांला बोध व ज्ञान प्राप्त होतात तेव्हां त्याला 'साक्षात्कार' म्हणावयाचें. तथापि सर्वसामान्यपणें दृष्टांतांनाहि अनुभव हें नांव दिलें जातें.

**प्र०**–'भावप्रचीति' आणि 'साक्षात्कार' यांमध्यें काय भेद आहे ?

**उ०**–भगवंताचा साक्षात्कार भावप्रचीतीनें किंवा प्रत्यक्ष दर्शनानें किंवा दोन्हीं प्रकारांनीं घेतां येतो.

**प्र०**–भावनेच्या पातळीवरील दृष्टांत आणि आध्यात्मिक पातळीवरील दृष्टांत यांमध्यें अंतर काय ?

**उ०**–आध्यात्मिक पातळी हें दृष्टांताचें उगमस्थान नाहीं. दृष्टांतामध्यें सूक्ष्म भौतिक, प्राणिक, मानसिक, आंतरात्मिक अथवा मनापेक्षां उच्चतर पातळीवरील दृष्टांत येतात. आध्यात्मिक पातळीवर येतात त्या भगवद्विषयक अनुभूति असतात. उदा०–सर्वस्थित आत्म्याच्या अस्तित्वाचा अनुभव येणें, सर्वांतर्यामीं भगवंताचा अनुभव येणें इत्यादि.

**प्र०**–प्रकृतीचें रूपांतर होण्यापूर्वीं उच्चतर पातळीवरील अनुभव येणें शक्य असते काय ?

**उ०**–होय. पण त्यामुळें प्रकृति रूपांतरित होत नाहीं; आंतरिक चेतनेच्या क्षेत्रांतील तो एक केवळ आंतरिक अनुभव असतो; आणि तेथें सुद्धां तेवढ्यानें खरी पूर्णता अशक्य असते.

**प्र०**–कांहीं लोकांना प्राणमय पातळीवरील स्वप्नें पडतात, दृष्टांत होतात. आध्यात्मिक दृष्टीनें ते अधिक विकसित असल्याचें हें लक्षण आहे काय ?

**उ०**–नाहीं. ज्यांच्या ठिकाणीं आध्यात्मिकतेचा लवलेशहि नाहीं अशा अनेकांना असे दृष्टांत होतात.

**प्र०**–आंतरात्मिक व आध्यात्मिक विकासाला प्राणमय पातळींवरील दृष्टांत व स्वप्नें साहयकारी होत नाहींत कां ?

**उ०**–नाहीं. पण सामान्य, देहविशिष्ट, मर्यादित जाणीवेपलीकडे जाण्यासाठीं आणि त्यामागील गोष्टी व व्यक्तीला प्रेरणा देणाऱ्या शक्ती जाणून घेण्यासाठीं त्यांचें साह्य होतें. मानसिक आणि प्राणमय पातळीवरील घटनांचे ज्ञान झाल्यावांचून संपूर्ण आत्मज्ञान होणें अशक्य असतें.

प्र०–आंतरात्मिक दृष्टीनें कांहीं एक न पहातां आध्यात्मिक विकास होणें शक्य आहे काय ?

उ०–'आंतरात्मिक दृष्टीनें' पहाणें म्हणजे तुला काय म्हणावयाचें आहे? दृष्टांत किंवा आंतरात्म्याला होणारें दिव्य सत्याचें दर्शन किंवा प्रचीति म्हणजे कां आंतरात्मिक दृष्टि असें तुला वाटतें? एकतर मनाच्या अतीत वर असलेल्या उगमाकडून येणाऱ्या आध्यात्मिक ज्ञानानें व अनुभवानें विकास होतो अथवा स्वतःचें आंतूनच येत रहाणाऱ्या आंतरात्म्याच्या प्रचीतीनें व अनुभूतीनें विकास होतो——याच दोन प्रमुख गोष्टी आहेत. पण मन नि प्राण यांचें आंतरिक अनुभव वाढणेंहि आवश्यक असतें, आणि या दृष्टीनें दृष्टांत व स्वप्नसृष्टींतील अनुभव यांनाहि स्थान असतें. एकाद्या साधकाचें ठिकाणीं एकादी गोष्ट प्रामुख्यानें दिसेल तर दुसऱ्या साधकाचें ठिकाणीं दुसरी एकादी. स्वप्रकृतिनुसार प्रत्येकाचा विकास होत असतो.

प्र०–अनुभव व ज्ञान यांत कांहीं भेद आहे काय?

उ०–प्रतीकात्मक सूचक स्वप्न पडलें तर तो अनुभव आणि त्याचा अर्थ उकलला म्हणजे तें ज्ञान.

प्र०–मला दिसणारीं दृष्यें व अनुभव हें समजून घेणें व त्यांतील गूढ अर्थ उकलणें यासाठीं लागणारें स्पष्ट ज्ञान मला केव्हां प्राप्त होईल?

उ०–भिन्न भिन्न पातळींवरील घटनांचा अर्थ काय आहे हें अभ्यासानें व अंतःस्फूर्तीनें समजूं लागलें म्हणजे. तुमची जाणीव व निरीक्षणशक्ति अधिकाधिक वाढली पाहिजे, म्हणजे झालें.

——श्रीअरविंद

Sri Aurobindo : Elements of Yoga : Page 61

# विचार शलाका

## कर्मयोग

आपल्यामध्यें असलेल्या भगवंताशीं, आपल्या सभोंवतीं असलेल्या विश्वात्म्याशीं आणि आपल्या वरती असलेल्या सर्वोत्तम विश्वातीताशीं निकटवर्तित्व आणि गाढ सामरस्य साधून कर्माचरण करणें आणि पृथगात्म, बंदिस्त व आपल्या स्वतःच्याच अज्ञानपूर्ण आदेशांचें आणि संकुचित सूचनांचें गुलाम असलेल्या मानवी मनामध्यें अडकून न पडणें म्हणजे **कर्मयोग**.

*

भगवंताची आज्ञा, सनातन संकल्पशक्ति, परात्पराच्या आज्ञा-सामर्थ्यानें प्रेरित अशी विश्वात्मक प्रेरणा यांच्या आदेशानुसार कर्माचरण करणें, अहंकार, दैन्य, वासना आणि मनोविकार यांच्या फटकाऱ्याखालीं न वागणें आणि मानसिक, प्राणिक व दैहिक पसंती नापसंतीच्या

अंकुशानें मार्गदर्शित न होणें, परंतु केवळ देवाकडून, अत्युच्च सत्याकडूनच कर्मप्रवृत्त होणें, म्हणजे **कर्मयोग**.

★

मानवी अज्ञानामध्यें न राहतां, आपला व्यक्तिगत स्वभाव आणि विश्वात्मक शक्ति यां-विषयीं जाणतें राहून विश्वातीत-सर्वोत्तम-सत्तेच्या आज्ञेस उन्मुख राहून दिव्य ज्ञानांमध्यें जगणें आणि कर्माचरण करणें म्हणजे **कर्मयोग**.

★

दिव्य, अमर्याद, आणि प्रकाशमय विश्वात्मक जाणिवेमध्यें राहणें, जगणें आणि कर्म करणें, वैश्विक जाणीवेपेक्षां श्रेष्ठतर जाणीवेपुढें उन्मुख असणें आणि जुन्या संकुचिततेमध्यें व अंधः-कारामध्यें चांचपडत आणि ठेंचाळत न पडणें म्हणजे **कर्मयोग**.

★

## अन्तस्थ गुरु

ज्याला ज्याला विद्यमान् संकुचिततेचा उबग आला आहे, जो कोणी प्रकट होणाऱ्या दिव्य माहात्म्यानें मोहित झाला आहे, ज्याला कोणाला अंतर्यामीं असलेल्या, भोंवती असलेल्या अथवा वर अतीत असलेल्या सर्वोत्तमाचें ओझरतें दर्शन झालेलें आहे, त्याला हांक ऐकूं दे आणि वाटचाल करूं दे. मार्ग बिकट आहे, परिश्रम कष्टप्रद, दुष्कर आणि प्रदीर्घ आहेत, पण त्यापासून मिळणारें पारितोषिक म्हणजे अतर्क्य वैभव, अगाध आनंद, सुखद आणि अनंत व्यापकता यामधील वास्तव्य हें आहे.

★

तुझ्या अंतस्थ असलेल्या किंवा या पार्थिव देहसदनामध्यें निवास करीत असलेल्या गुप्त मार्गदर्शकाचा शोध कर, त्याचे शब्द श्रवण कर आणि त्यानें दाखविलेल्या मार्गाचें सदैव आच-रण कर. अखेरीस, कधींहि अंतर न देणारा प्रकाश, वंचित न करणारें सत्य, मार्गापासून दूर न भटकणारी वा न अडखळणारी शक्ति, विशाल स्वातंत्र्य आणि अवर्णनीय सौंदर्य यांची तुला प्राप्ति होईल.

★

## अनन्ताचा आत्माविष्कार

दूरचे स्वर्गलोक महान् आणि आश्चर्यकारक आहेत; पण तुझ्या अंतर्यामीं असलेले स्वर्ग-लोक त्यांहूनहि अधिक महान् आणि अधिक आश्चर्यकारक आहेत. हे स्वर्गलोक त्या दिव्य-कर्म्याची वाट पहात आहेत.

जें कांहीं आहे तें सर्वोत्तमाचें आत्माविष्करण आहे. तसेंच जें कांहीं अजून झालेलें नाहीं तें त्यानेंच राखून ठेवलेलें त्याचेंच रूप आहे. या अनंतानें आपल्या स्वतःला अव्यक्त शक्तीं-च्या खेळामध्यें, गूढ नेणिवेच्या गर्तेमध्यें झांकून घेतलेलें आहे आणि अखेरीस आपलें अत्यंत निकटचें सान्निध्य, सर्वांगीण परिपूर्ण सामर्थ्य, प्रकाश, सौंदर्य, आनंद आणि अत्यंत विशाल व अवर्णनीय अस्तित्व, चेतनेच्या वाढत्या प्रकाशद्वारां तो अभिव्यक्त करील. ही चेतना अजून अज्ञानमय असून ती जडतत्त्वांतून उत्क्रांत होत आहे. मानव हा त्या चेतनेचा केवळ एक टप्पा आहे. तो एकाच वेळीं शिखर आहे आणि आरंभबिंदु आहे. आतांपर्यंतच्या चेतनेच्या आरोहणाचा कळस आहे. परंतु अजूनहि करावयाच्या महानतर आरोहणाचा केवळ प्रारंभ-बिंदु आहे.

हा समग्र आविष्कार-उत्क्रांति नव्हे—म्हणजे एकमेव अनंताची स्वतःशींच चाललेली एक लीला आणि आत्माविष्कार आहे; दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर त्याचें अस्तित्व, जाणीव, सामर्थ्य, आनंद, त्याची स्वयंप्रज्ञा, स्वयं सत्ता, स्वयं आनंद यांचा, त्या खेळांतील वैभव, आनंद आणि सौंदर्य यांसाठींच केवळ असलेला आत्माविष्कार होय.

सर्व उत्क्रांति म्हणजे नेणिवेमधून, अज्ञानाच्या द्वारां संपूर्ण आत्मज्ञानापर्यंत प्रगत होणारा, त्या एकमेवाला आपल्या स्वतःचाच अनंतरूपांतून घडलेला, आत्मसाक्षात्कार होय.

उत्क्रांतीला उद्दिष्ट आहे; पण तें वर्तुळाकाररूप उद्दिष्ट आहे. अभावांतून अस्तित्वाकडे, 'नाहीं' तून 'हो' कडे, आणि अल्पाकडून अधिकाकडे जाणारी ती सरळरेषा नव्हे.

★

स्थल-काल-दृष्टचा विश्वाला आरंभ आणि अंत नाहीं. कारण विश्व म्हणजे सनातनाचा आणि अनंताचा आविष्कार.

आविष्कार ही चिरंतनाची उपकथा नव्हे; तें त्याचें जणुं वदन आहे. अविनाशी, ऐश्वर्य-मय असा त्याचा देह आहे; सान्त वस्तूंना आपल्या परिश्रमानंतर जशी निद्रेची आणि विश्रां-तीची आवश्यकता असते तशी आवश्यकता नसणाऱ्या त्याच्या आनंदाचें आणि शक्तीचें तें चलनवलन असतें.

★

असें म्हणतात कीं प्रारंभीं शाश्वत, अनंत आणि एकमेव होतें. मध्यंतरीं सान्त, नश्वर आणि अनेक आहे; आणि अखेरीस एकमेव, अनंत आणि शाश्वत असें असेल.

मग प्रारंभ केव्हां होता? कालांतील कोणत्याच क्षणीं नव्हे, कारण प्रत्येक क्षणाला प्रारंभ आहे. आरंभ सदैव होता, सदैव आहे आणि सदैव राहील. दिव्यप्रारंभ हा कालाच्या पूर्वीं, कालाच्या मध्यें आणि कालाच्या पलीकडेही निरंतर आहे. चिरंतन, अनंत आणि एकमेव हा निरंतर आरंभ आहे.

आणि मग मध्य कोठें आहे? मध्यच नाहीं. कारण मध्य हा सातत्यरूप शेवट आणि शाश्वत प्रारंभ यांना सांधणारा दुवा आहे. प्रतिक्षणाला नित्य नूतन रूप धारण करणाऱ्या निर्मितीची ती खूण आहे. निर्मिति ही सदैव होती, सदैव आहे आणि सदैव राहील. शाश्वत

अनंत आणि एकमेव ही त्याच्या स्वतःच्या अस्तित्वाची जादुमय अशी मध्यावस्था होय. आद्यंत विरहित निर्मिति म्हणजे तोच होय.

मग अंत केव्हां होतो ? अंतच नाहीं ! जाणल्या जाणाऱ्या कोणत्याहि क्षणीं विराम नाहीं. कारण वस्तुजातांचा सर्व विनाश म्हणजे नूतन वस्तूंचा आरंभच असतो; आणि हेंहि नित्यविकासशील आणि पुनः पुनः जन्म घेणाऱ्या आकारांतील एकमेवाचेंच स्वरूप असतें. कशाचाहि विनाश होऊं शकत नाहीं. कारण सर्व कांहीं शाश्वत असा तोच आहे शाश्वत, अनंत आणि एकमेव हा, त्याच्या वैभवाच्या कधींच न संपणाऱ्या नव्या मार्गावरील, कधींच न थांबणारा अतर्क्य असा अंत आहे.

—श्रीअरविंद

# सत्यनिष्ठा

**(विद्यार्थ्यांसाठीं)**

एकदां एका वनांत एका सिंहानें, कोल्ह्यानें आणि लांडग्यानें, तिघांनीं मिळून शिकार केली. त्यांनीं एक गाढव, हरीण व एक ससा मारला.

ती सर्व शिकार आपल्या पुढयांत ठेवून सिंह लांडग्याला म्हणारा, "काय रे लांडगोबा, आपल्या शिकारीची वांटणी आपण कशी काय करूं या ?"

लांडगा म्हणाला, "तीन पशू आहेत. वांटणीसाठीं तुकडे नकोतच करायला ! आपण गाढव घ्या. कोल्हा ससा पटकाविल; माझें काय ? मी आपला हरीणच खाऊन समाधान मानीन."

ही सूचना ऐकतांच सिंहानें भयंकर गर्जना केली आणि आपल्या पंजाच्या तडाख्यानें लांडग्याच्या डोक्याला टोला दिला. आपल्या मानभावी मसलतीचें लांडग्याला चांगलेंच शासन घडलें.

नंतर सिंह कोल्ह्याकडे वळून म्हणाला, "मित्रा, कोल्होबा, तुझें काय मत आहे वांटणीबद्दल ?"

"महाराज, गोष्ट तर स्पष्ट आहे", अत्यंत विनयानें नमस्कार करून कोल्हा म्हणाला, "आपण न्याहारीच्या वेळीं गाढव खावें, हरीण सायंकाळच्या भोजनासाठीं राखून ठेवावें आणि दोन्हीं जेवणांमध्यें फराळासाठीं ससा हवाच !"

"वा। छान !" सर्व शिकार आपल्याच पदरांत पडणार, म्हणून खुषींत येऊन सिंह म्हणाला, "खरंच, कोल्होबा, कुठून रे शिकलास इतकं चांगलं बोलायला ? केवढा विचार ! केवढें औचित्य ! !"

"मला तर या लांडग्यानें हें शिकविलें", कोल्होबानें धूर्तपणें उत्तर दिलें.

कोल्हा असें कां बरें म्हणाला ? आपलें खरें खरें मत सांगावयाचें होतें कां त्याला ? छे! मग काय, सिंहाला खरंच का खुष करायचं होतं त्याला ? छे ! नाहीं. तसंहि निश्चितच नाहीं. केवळ भीतीनें तो तसें बोलला. बिचाऱ्याची कींव केली पाहिजे. तो जें बोलला तें खोटें, हें तर केव्हांहि मान्य करावयास हवें. अर्थात् तो चातुर्यानें बोलला हें खरें ! पण सिंहानें त्याचें कौतुक केलें, तें तरी काय, सत्य-प्रेमानें ? छे ! मांसाचा मोह सोडवत नव्हता म्हणून.

★

ज्यू लोकांचें पवित्रक्षेत्र जेरुसलेम. तेथें सॉलोमन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या कीर्तीबद्दल पुष्कळ गोष्टी अबू अब्बास नांवाच्या एका मुसलमान लेखकानें लिहिल्या आहेत.

त्या राजाच्या दरबारांत ६०० आसनें होतीं. त्यांतील निम्या आसनांवर ज्ञानवृद्ध लोक बसत असत; आणि बाकीची ३०० आसनें स्थलदेवता, भूत-पिशाच्चें यांच्याकरितां होतीं. कारण आपल्या अद्‌भुत शक्तीनें तीं राजास मदत करीत असत.

दरबार भरला म्हणजे राजाच्या केवळ शब्दासरशी शेंकडो भले मोठाले पक्षी दरबारांत येत आणि सहाशें सभासदांवर आपले पंख पसरून दरबार संपेपर्यंत सावली धरीत. रोज सकाळ संध्याकाळ, राजाचा हुकुम होण्याचा अवकाश, जोराचा वारा सुटे आणि एरवीं पोंचण्यास सहज महिना तरी लागेल अशा ठिकाणीं क्षणार्धांत तो राजवाडा जाई. त्यामुळें साहजिकच त्याला राज्यांतील दूरवरच्या प्रदेशांचा कारभार देखील घरबसल्या पहातां येत असे.

सॉलोमन बादशहानें आपलें सिंहासनहि अत्यंत अद्‌भुत असें बनवून घेतलें होतें. त्याचा विशेष हा कीं, राजा त्यावर बसला असतां कोणीहि त्याच्यापुढें खोटें बोलण्यास धजूं शकत नसे.

हिरे, मोतीं, पाचूं, माणकें इत्यादि रत्नांनीं जडविलेलें तें हस्तिदंताचें सिंहासन होतें. त्याच्याभोंवतीं चार सोन्याचे ताडवृक्ष होते. त्यांना चमकदार माणिकमोत्यांचे घोस टांगलेले होते. त्यांतील दोन वृक्षांवर सोन्याचे दोन मोर आणि उरलेल्या दोनवर सोन्याचीं दोन गिधाडें बसविलेलीं होतीं. सिंहासनाच्या दोन्हीं बाजूस पाचूंच्या दोन स्तंभामधोमध सुवर्णाचे दोन सिंह बसविले होते. माणकांचीं द्राक्षें लटकलेल्या वेलींनीं ताडवृक्षांना विळखे घातलेले होते.

इस्रायल राष्ट्राचे वृद्ध लोक, सॉलोमन बादशहाच्या उजवीकडे सोन्याच्या आसनांवर बसत आणि उजव्या चांदीच्या चौरंगांवर त्या स्थलदेवता बसत.

न्यायसभेंत राजा न्यायदान करीत असतांना सामान्य लोकांनाहि आंत येण्यास परवानगी असे. खटला चालू असतांना जर कोणी साक्षीदार कांहीं खोटें-नाटें सांगूं लागला तर एकदम कांहीं चमत्कार घडे व राजा आणि वनराजा यांसह तें सिंहासन त्या साक्षीदाराकडे फिरत असे. सिंह आपले पंजे पुढें काढून आपल्या शेपटीच्या तडाख्यानें जमीन हादरून सोडत, मोर आणि गिधाडें आपल्या पंखांचा फडफडाट करीत आणि मग तो साक्षीदार असा कांहीं भीतीनें थरथरूं लागे कीं, पुढें आणखी खोटें बोलण्याचें धैर्य त्याला रहातच नसे.

या सर्व कारणांमुळें राजाचें काम अगदीं सुकर होत असे. न्यायनिवाडाहि सहज करतां येई हें निश्चित; पण .... भीति ही अगदीं हीन गोष्ट आहे आणि तिचें तर सत्याला वावडें आहे.

अबू अब्बासनें सांगितलेल्या या गोष्टींत म्हटल्याप्रमाणें भीतीनें मनुष्याला खरें बोलणें भाग पडतें हें खरें; पण त्यामुळें कांहीं तो मनुष्य सत्यनिष्ठ होऊं शकत नाहीं. कारण पहिल्या गोष्टींतील कोह्याप्रमाणें भीतीमुळें दुसऱ्याच क्षणीं तोच मनुष्य धडधडीत खोटेहि बोलण्यास तयार होईल; आणि असें अनेकवेळां घडतेंहि.

खरें बोलण्यास शिकण्यासाठीं सरळ मनाच्या प्रामाणिक माणसाला सालोमनच्या सिंहासनासारख्या अद्‌भुत गोष्टींची आवश्यकता नाहीं. त्याच्या हृदयसिंहासनावरच सत्य अधिष्ठित झालेलें असतें, आणि तें त्यास सत्य बोलण्याची प्रेरणा देते. तो गुरूच्या, न्यायाधिशाच्या किंवा मालकाच्या भीतीमुळें खरें बोलतो असें नव्हे, तर—सरळ अंतःकरणाच्या माणसाचा तो मुळीं स्वभावच असतो. तो भीतीवर विजय मिळवितो. कांहींहि घडो, कशाचीहि पर्वा न करतां त्याला जें बोलावयाचें तें तो, सत्यप्रेमाच्या जोरावरच निर्भयपणें बोलतो.

★

पराक्रमी आणि अत्यंत ऐश्वर्यसंपन्न राजा विश्वामित्र, पराकाष्ठेची प्रतिष्ठा मिळावी म्हणून उत्सुक होता. आपल्या क्षत्रिय वर्णाहून श्रेष्ठ, ब्राह्मण वर्णांत आपल्याला स्थान मिळावें यासाठीं त्यानें तपश्चर्या करण्याचें ठरविलें.

त्यासाठीं जरूर तें सर्व कांहीं केलें. त्याची खडतर तपश्चर्या पाहून लोक म्हणूं लागले कीं 'खरेंच, महाराज अगदीं ब्रह्मपद मिळविण्यास योग्य आहेत; पण ब्राह्मणश्रेष्ठ वसिष्ठांचें मात्र मत निराळें होतें. त्यांना माहीत होतें कीं त्याचा त्याग-विराग हा खरा-खरा नाहीं; त्याचें वागणें हें केवळ वरकरणी आहे. त्यामुळें विश्वामित्राला ब्रह्मर्षि म्हणून मान द्यायला वसिष्ठ तयार नव्हते.

त्यामुळें संतापानें वेडा झालेल्या विश्वामित्रानें वसिष्ठाच्या कुलांतील शंभर मुलें ठार केलीं. अतोनात दुःख यातना झाल्या तरी, कधींहि खोटें न बोलण्याच्या आपल्या निश्चयापासून वसिष्ठ ढळले नाहींत. तें पाहून विश्वामित्र राजानें त्या सत्यनिष्ठ वसिष्ठांनाच ठार मारण्याचें ठरविलें.

एके दिवशीं संध्याकाळीं हें कृष्ण-कृत्य करण्यासाठीं विश्वामित्र राजा वसिष्ठांच्या झोंपडीकडे जाण्यास निघाला. त्यांच्या झोंपडीच्या दाराशीं पोंचतांच, त्यांचें आपल्या पत्नीशीं चाललेलें बोलणें, विश्वामित्रानें ऐकलें. त्यांत आपल्या नांवाचा उल्लेख ऐकून तो तेथेंच थांबला. पण अगदीं शुद्ध, शांत आणि करुणापूर्ण अंतःकरणानें काढलेलें वसिष्ठांच्या तोंडचे उद्‌गार ऐकून राजाचें मन गहिंवरलें. त्याला पश्चात्ताप झाला. हातांतलें शस्त्र त्यानें फेंकून दिलें आणि आंत जाऊन त्यानें वसिष्ठ ऋषींच्या चरणावर लोटांगण घातलें.

राजाचा हृदयपालट पाहून ब्राह्मणश्रेष्ठ वसिष्ठानें 'ब्रह्मर्षि' म्हणून त्याचा मोठ्या प्रेमानें गौरव केला.

'या पूर्वींच आपण माझ्या तपश्चर्येचा गौरव कां केला नाहीं बरें?' असें विश्वामित्रानें मोठ्या विनयानें विचारलें.

'त्याचें कारण असें कीं तुला आपल्या सामर्थ्याचा गर्व होता व त्याच्या जोरावर तूं ब्रह्मपद मिळविण्याचा यत्न करीत होतास. आतां मात्र तुला खराखुरा पश्चात्ताप झाला आहे आणि खरी ब्राह्मणाची वृत्ति तुझ्यांत आली आहे!' वसिष्ठ उत्तरले.

भीति अथवा द्वेष यांच्या आहारीं न जातां खरें कसें बोलावें हें वसिष्ठ जाणत होते.

★

थोडासा त्रास सोसावा लागला तरी नेहमीं खरेंच बोलणें चांगलें नाहीं कां? शिवाय अशातऱ्हेनें जे लोक सत्यासाठीं त्रास सोसतात त्यांच्या बाबतींत त्यांच्या विपत्तींचे शेवटीं विजयांत रूपांतर झालेलें दिसतें. सुरुवातीस असत्य विजयी झाल्यासारखें वाटलें तरी असत्याचा कधींच खरा विजय होत नाहीं. सत्यवर्तन हेंच नेहमीं यशस्वी धोरण ठरतें.

एकदां सकाळचे वेळीं दिल्लीपतीनें दरबार भरविला. सद्‌गुणी लोकांना देणग्या द्यावयाच्या होत्या. जवळ जवळ समारंभ संपण्याच्या सुमारास त्याला असें आठवलें कीं नामांकित लोकांपैकीं सैय्यद महमद नांवाचा एक तरुण आलेला नाहीं.

सिंहासनावरून उतरून पालखींत पुनः बसण्याच्या तयारींत बादशाहा असतांना तो तरुण घाईघाईनें तेथें येऊन दाखल झाला.

सैय्यदच्या वडिलांना बादशाहा म्हणाला, 'आपल्या चिरंजीवांनीं उशीर केला."

"कां रे उशीर झाला?" क्रुद्ध नजरेनें पहात वडिलांनीं विचारलें.

"महाराज, मला गाढ झोंप लागली होती." मोकळपणानें खरेंखुरें कारण सैय्यदनें सांगितलें.

दरबारी मंडळी आश्चर्यानें त्याच्याकडे पहात राहिली. "महाराजांच्या पुढेंहि कसा उद्धटपणानें बोलतो आहे! एखादी थाप नाहीं कां ठोकून द्यायची? काय मूर्ख आहे!" सर्व एकमेकांत म्हणूं लागले.

पण बादशाहानें क्षणभर विचार केला. त्याच्या खरेपणाबद्दल त्याला कौतुक वाटलें. या सत्कृत्याच्या सन्मानार्थ त्यानें सैय्यदला मोत्याची माळ व शिरपेच बहाल केला.

राजा असो वा रंक असो, कोणाच्याहि पुढें सारखेंच सत्य बोलणाऱ्या सैय्यद हुसेनला त्याच्या खरेंपणाचें हें बक्षिस मिळालें.

★

यावरून हें स्पष्ट होतें कीं, निःशंकपणें खरें बोलतां यावें यासाठीं आपली वागणूक अशीच सरळ ठेवायला पाहिजे कीं, आपल्याला दुसऱ्यापासून कांहीं दडवून ठेवण्याची पाळीच येऊं नये. यासाठीं, परमेश्वर नेहमींच आपल्याजवळ उभा आहे, अशी सतत जाणीव ठेवावी.

कारण सत्य भाषणाकरितां सत्यवर्तन हेंहि आवश्यक आहे. जो मनुष्य बोलण्यामध्यें कोणत्याहि प्रकारचे असत्य येऊं देत नाहीं आणि ज्याच्या वागण्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा ढोंगीपणा नसतो तोच खरा सत्यनिष्ठ.

अमरोहा येथें 'कागझी' नांवाची विशिष्ट प्रकारचीं मातीची भांडीं तयार होत. तेथील चित्रकार त्या भांडयांवर सुंदर रूपेरी नक्षी काढत असत. दिसण्यांत कमालीचीं सुंदर असूनहि तीं भांडीं इतकीं हलकीं आणि नाजूक असत कीं एवढयाशा धक्क्यानें सुद्धां त्यांचा फुटून चक्काचूर होऊन जात असे. जेवायलाखायला वापरण्यासाठीं तीं उपयोगी आहेत असें वाटलें तरी त्यांच्याकडे पाहूनच केवळ समाधान मानावें लागे.

'कागझी' भांडयांसारखीं पुष्कळ माणसें असतात. दिसायला मोठी गोड, पण कसोटीची वेळ आलीं कीं त्यांच्यांत देखाव्याखेरीज कांहींच नाहीं, ही गोष्ट उघड होते. त्यांच्यावर एवढासुद्धां विश्वास ठेवूं नका; कारण त्यांच्या दुबळ्या व नाजूक स्वभावाला विश्वासाचें एवढें मोठें ओझें नाहीं झेपायचें.

★

अशी एक गोष्ट सांगतात कीं, पूर्वीं एका ब्राह्मणानें आपल्या मुलाला एका पंडिताकडे काशीस विद्याभ्यासासाठीं पाठविलें. बारा वर्षांनीं तो आपल्या गांवीं परत आला. तेव्हां सर्व गांवकऱ्यांना वाटलें, हा मोठा विद्वान् झाला. म्हणून त्याला भेटण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें सर्वजण त्याच्याकडे गेले. त्यांनीं एक संस्कृत पुस्तक त्याचे पुढें ठेवलें; व त्याला विनंति केली, 'पंडित महाराज, आम्हाला यांतील तत्त्व समाजावून सांगा."

तो तरुण पंडित कितीतरी वेळ त्या पुस्तकाकडे लक्षपूर्वक पहात राहिला. त्याला एका शब्दाचाहि अर्थ लागेना. काशीला तो मुळाक्षराखेरीज कांहींच शिकला नव्हता. फळ्यावर लिहिलेलीं मोठालीं अक्षरें फक्त त्याला, रोज चांगलें देऊन लक्ष पाहिल्यानंतर, सरावानें येऊं लागलीं होतीं.

म्हणून त्या ग्रंथाकडे तो शांतपणें पहातच राहिला. त्याच्या डोळ्यांत अश्रू भरून आले.

"यांतील कांहींतरी तुमच्या अंतःकरणाला जाऊन भिडलेलें दिसतें, महाराज, कृपा करून आम्हाला सांगा, त्यांत काय आहे तें", आलेले लोक म्हणाले.

"काशी क्षेत्रांत केवढीं मोठालीं अक्षरें होतीं; पण अरेरे, आतां ती किती बारीक झालीं आहेत !" पंडित उत्तरला.

होता, नाहीं कां, हा पंडित 'कागझी' भांड्यासारखाच ?

★

गंगा कांठच्या डोंगर-दऱ्यांत एक लांडगा रहात होता. एकदां बर्फ वितळल्यामुळें नदीला तुफान पूर येऊं लागला. लांडगा रहात होता त्या खडकाभोंवतीं सगळीकडे पाणीच पाणी झालें. त्यामुळें त्यादिवशीं शिकारीच्या शोधार्थ बाहेर पडणें त्याला अवघड झालें. तेव्हां, आज कांहीं खायला नाहीं, हें पाहून तो स्वतःशींच म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं, आज चांगला पवित्र दिवस आहे. आज आपण उपवास करणार !"

असें ठरवून तो त्या मोठ्या खडकावर एका बाजूस, उपवासाचा पवित्र-दिन पार पाडण्यासाठीं अत्यंत शांत, सोज्वळ मुद्रा धारण करून बसला.

थोडावेळ गेल्यानंतर रानांतील एक शेळी या खडकावरून त्या खडकावर उड्या मारीत

पाण्याच्या प्रवाहांतून त्या खडकावर येऊन ठेपली. मोठ्या भक्तिभावानें लांडगोबा तेथें ध्यान करीत बसले होते.

तिला पाहून लांडगा आनंदानें उद्गारला, "वा ! मिळालें, मिळालें मला खायला !" आणि त्यानें तिच्यावर झडप घातली. पण त्याच्या तडाख्यांतून ती निसटली. पुनः त्यानें हल्ला केला; पण आतांहि त्याचा प्रयत्न वाया गेला. शेवटीं तर प्रवाहाच्या पलीकडे एका खडकावर तिनें उडी घातली आणि ती निसटली.

पुनः साधूसारखें रूप धारण करून तो म्हणाला, "वा ! आजच्या शुभदिवशीं शेळीचें मांस खाऊन मी भ्रष्ट होऊं काय ? छे ! भलतंच काँहींतरी. उपवासाच्या दिवशीं, आणि मांस ? शान्तं पापम् !"

लांडग्याच्या या भक्तिभावाबद्दल, त्याच्या ह्या नेमिष्ठपणाबद्दल काय म्हणाल तुम्ही ? त्याच्या ढोंगाला तुम्ही हंसाल. पण या लांडग्यासारखींच प्रामाणिक अशी कितीतरी माणसें असतात ! स्वार्थ साधण्यासाठीं भाबडेपणाचें ते ढोंग करतात. उघडपणें दुष्कृत्यें करतां येत नाहींत म्हणून साधूचा वेष ते घेतात. पण कितीहि धूर्तपणानें व हुशारीनें वागलें तरी सत्य व न्याय यांची कांस धारणाऱ्यांच्या पुढें भोंदू फार काळ टिकाव धरूं शकतील, असें तुम्हाला वाटतें काय ?

(अपूर्ण)

—श्रीमाताजी

CWMCE Vol 02 : Page 208

———

आपल्या वाणीमधून किंवा लेखनद्वारां लहानसें कां होईना, असत्य व्यक्त होण्यास जर आपण वाव दिला तर दिव्य सत्याचे सपूर्ण सदेशवाहक होण्याची आपणांस कशी आशा करतां येईल ?

दिव्य सत्याच्या संपूर्ण सेवकानें यत्किंचितहि अयथार्थता, अतिरेक किंवा विकृति यांपासून अलिप्त राहिलें पाहिजे.

—श्रीमाताजी

# दिव्य जीवन

( नोव्हेंबर अंकावरून पुढें चालू )

आत्मतत्त्वाचें सत्य आपल्या प्रकाशानें आणि संकल्पानें जें मार्गदर्शन करील त्यावर पूर्णपणें अवलंबून चालावयाचें आणि जीवनांत आत्मतत्त्वाचें तेजोमय, प्रकाशमय आविष्करण करावयाचें असा नियम जीवनाच्या नियंत्रणासाठीं या नव्या आध्यात्मिक व्यक्तींना करावयाचा म्हटलें तर अगोदर अशी कल्पना करावी लागेल कीं या व्यक्ती (हे समाज) अतिमानसिक जगांत आहेत. अतिमानसिक जगांत सर्व रहिवाशांची जाणीव अतिमानसिक पायावर उभी असेल. अशा जगांत एकाद्या अतिमानसिक समाजाच्या घटक व्यक्तिमध्यें किंवा अशा अनेक समाजांच्या व्यक्तींमध्यें जो जीवन-विनिमय होईल, त्यांत स्वभावतः परस्परांचें परस्परांना पुरतें ज्ञान असेल आणि म्हणून एकमेकांविषयीं कसलाहि गैरसमज न होतां त्यांच्यामध्यें पूर्ण सुसंवाद नांदेल. पण वास्तवांत, अतिमानसिक आत्मज्ञानी व्यक्तींना आपलें जीवन जगावयाचें तें आत्मज्ञानहीन अज्ञानी व्यक्तींच्या मेळयांत किंवा त्यांच्या आजूबाजूला जगावें लागणार. या व्यक्तींना अज्ञानी जमावांत राहून किंवा त्याबाहेर जाऊन त्याच्या शेजाराला आपलें आत्मज्ञाननिष्ठ जीवन जगण्याचा प्रयत्न करावा लागणार. आणि या दोन जीवनांचे व्यवहार-नियम तर एकमेकांना विरोधी व एकमेकांना बाधक आहेत. अशा परिस्थितींत आध्यात्मिक समाजाचें जीवन अज्ञाननिष्ठ जीवनापासून अगदीं अलगपणें एक प्रकारच्या पूर्ण एकांतांत जगतां येईल अशी व्यवस्था केली जाणें अवश्य दिसतें. असें न केल्यास या दोन प्रकारच्या जीवनामध्यें कांहीं तडजोड करणें अपरिहार्य होईल; आणि तडजोड म्हटली कीं हीन जीवनानें उच्च जीवन दूषित होणें किंवा उच्च जीवन सदोष आणि अपूर्ण रहाणें हा धोका अटळ होतो; दोन भिन्न आणि अन्योन्यविरोधी जीवनतत्त्वें एकमेकांच्या सान्निध्यांत आलीं, म्हणजे श्रेष्ठ तत्त्वाचा आणि जीवनाचा परिणाम जसा कनिष्ठ तत्त्वावर आणि जीवनावर होईल, तसा कनिष्ठाचा पण श्रेष्ठावर होईल; दोन जीवनांत सान्निध्यानें विचार-आचाराचा विनिमय सुरुं झाला कीं दोघांचा एकमेकांवर परिणाम होत असतो हा नियम आहे. या दोन जीवनांचा संबंध आल्यानें त्या दोहोंत सारखा संघर्ष आणि झगडा होत रहाणें हाच एक त्या संबंधांतून पहिला नियम कां निघणार नाहीं असा देखील प्रश्न करतां येईल. कारण, अज्ञानाच्या जीवनांत तामस शक्तींचा भयंकर प्रभाव सर्वत्र व्यापून रहातो आणि आपलें तामसी कार्य करीत रहातो. तामस शक्ति स्वभावतः अमंगलाला आणि अत्याचाराला प्रोत्साहन देतात, साह्य करतात; मानवी जीवनांत उच्चतर प्रकाश आला कीं त्याला कलंकित करणें, त्याचा सर्वनाश करणें यांतच तामस शक्तींना त्यांचा स्वतःचा स्वार्थ दिसतो; जें जें कांहीं नवें असेल, मानवी अज्ञानानें जी व्यवस्था रुढ केली आहे तिच्यापेक्षां उच्च पातळीवर जाण्याचा प्रयत्न करणारें जें कांहीं असेल, त्या व्यवस्थेकडे पाठ फिरविणारें जें कांहीं असेल त्याला विरोध करणें, त्याच्याशीं असहिष्णुतेनें वागणें, त्याचा प्रसंगीं छळहि करणें,

तें नवें यशस्वी झाल्यास हीन पातळीवरील शक्तींचा त्या नव्यांत भानगडी माजविण्यासाठीं शिरकाव करून देणें या गोष्टी जगानें पूर्वी केल्या. नव्याचें पारडें वर झाल्यानंतर, तें यशस्वी झाल्यानंतर हीन शक्तींच्या द्वारां तें कलंकित करून मग त्याला जगानें मान्यता दिली. जगाची ही मान्यता त्याच्या विरोधापेक्षां अधिक धोक्याची ठरली; या मान्यतेमुळें त्या नव्या जीवनतत्त्वाचें जीवन कोठें कोठें समाप्त झालें, कोठें कोठें तें समाप्त झालें नाहीं पण खालच्या पातळीवर येऊन बसलें, कलंकित झालें; पूर्वकाळीं हें असें वारंवार घडलेलें आहे. केवळ नवेपणाचें, साध्या नवेपणाचें हें "स्वागत" जगानें केलें—तर जें साधें नवें तत्त्व नाहीं, सर्वांशीं मौलिक नवें आध्यात्मिक तत्त्व आहे आणि ज्याचा नवा प्रकाश आणि नवी सत्ता सर्व पृथ्वी-वर आपला प्रभुत्वाचा वारसा हक्क सांगत आहे त्याचें स्वागत कसें होईल याची कल्पना करणें अवघड नाहीं. हें उघड आहे कीं, या नव्या तत्त्वाच्या प्रकाशाला पूर्वीपेक्षां अधिक अत्याचारी विरोध होण्याचा संभव आहे आणि म्हणून तें विफल होण्याचा पूर्वीपेक्षां अधिक संभव आहे. तथापि अशी कल्पना करणेंहि वावगें नाहीं कीं, नवा प्रकाश जसा पूर्वींहून अधिक पूर्ण असेल, तसा तो पूर्वींहून अधिक पूर्ण नवें सामर्थ्यहि बरोबर घेऊन येईल. त्यामुळें त्याला सामान्य जगापासून अगदीं वेगळें रहाणें अवश्य होणार नाहीं असा संभव आहे; साग-रांत जागोजाग लहान लहान बेटें असावींत त्याप्रमाणें या नव्या प्रकाशानें युक्त असे लहान लहान समाज जगांत जागोजाग स्थिरावतील आणि तेथून हा नवा प्रकाश जुन्या जीवनाच्या क्षेत्रांत पसरत राहील, जुन्या जीवनावर आपले प्रभावी किरण वरून फेंकीत राहील, जुन्या जीवनांत पाण्याप्रमाणें आपले पाझर खालून मिसळावें असें करील; याप्रमाणें हळूहळू त्याजवर आपली छाप पाडील, त्याला साह्य करीत राहील, नवें ज्ञान देत राहील; आणि मानवतेंत नवी उच्च आकांक्षा उदय पावून, कालांतरानें या नव्या आकांक्षेला नव्या प्रकाशा-कडून होत असलेल्या साह्याची आणि मिळत असलेल्या ज्ञानाची किंमत कळूं लागन ती आकांक्षा या नव्या प्रकाशाचें मनापासून स्वागत करूं लागेल. या सगळ्या गोष्टी संभवनीय आहेत.

आतांपर्यंत चर्चिलेले प्रश्न हे संक्रमण कालांतील प्रश्न आहेत, कांहीं एका मर्यादेपर्यंतचे विकास विषयक प्रश्न आहेत हें उघड आहे. ज्या दिशेनें चैतन्यशक्ति आजपर्यंत एक एक पाऊल टाकीत व्यक्त होत होती किंवा व्यक्त होत आहे त्या दिशेच्या उलट दिशेला पूर्णपणें आणि यशस्वीपणें वळून ती चालू लागली आणि पृथ्वीवरील व्यवस्थेचा एक स्थायी घटक म्हणून जसा आज मनोमय जीव (मनुष्य) आणि त्याचें जीवन कायम झालें आहे त्याप्रमाणें त्या व्यवस्थेचाच एक स्थायी घटक म्हणून अतिमानसिक जीव (अतिमानस पातळीवर चढलेला मनुष्य) आणि त्याचें जीवन कायम झालें म्हणजे वरील प्रश्नांची भानगड रहाणार नाहीं. अतिमानसिक चैतन्य पृथ्वीवरील जीवनांत येऊन कायम झालें म्हणजे नव्या अतिमानसिक मानवापाशीं जुन्या मानसिक मानवापेक्षां कितीतरी अधिक ज्ञान आणि सामर्थ्य राहील. अति-मानसिकांचा समाज सामान्य समाजापासून विभक्त राहिला तर, आज मानवांच्या जीवनाला ज्याप्रमाणें मानवेतरांच्या जीवनाच्या उपसर्ग पोंचत नाहीं त्याप्रमाणें मानवांच्या सामान्य जीव-नाचा अतिमानसिकांना उपसर्ग पोंचणार नाहीं. तथापि अतिमानसिकांच्या सामाजिक जीव-नांतील डोळस ऐक्य ज्या उच्च ज्ञानाच्या, सामर्थ्याच्या आणि उच्च प्रकृतीच्या प्रभावानें

निश्चितपणें घडून येतें, त्या ज्ञानादिकांच्या प्रभावानें या दोन वेगळ्या प्रकारच्या जीवनांच्या परस्परसंबंधांतहि सुसंवाद नांदू शकेल हें निश्चित. पृथ्वीवर अतिमानसिक तत्त्वाचा अवतार झाला कीं, त्याचा प्रभाव अज्ञानमय जीवनावर निश्चितपणें पडून कांहीं एका मर्यादेपर्यंत त्यांत सुसंवाद अपरिहार्यपणें नांदूं लागेल. आणखी अशीहि कल्पना करावयास हरकत नाहीं कीं, अतिमानसिक जीवन अज्ञाननिष्ठ जीवनाहून वेगळें असलें तरी त्या सामान्य मानवी जीवनांत जो कांहीं अंश आध्यात्मिकतेकडे, जाणीवेच्या उंच शिखराकडे पावलें टाकणारा असेल तो अंश तें आपल्यांत समाविष्ट करून घेईल. बाकीचें मानवी जीवन मानसिक जाणीवेच्या आधारानें जुन्या पायावर आपलें संघटन करील. पण या संघटनाच्या कामांतहि मन, त्याला कळेल तेवढचा अतिमानसिक ज्ञानाची मदत घेऊन, आजच्यापेक्षां अधिक सुसंवाद असणारें संघटन घडवून आणील. आजहि सामान्य मानवतेंत सुसंवादमय संघटन करण्याची पात्रता आलेली नाहीं. अमुक होऊं शकेल, तमुक होऊं शकेल अशा शक्यतेच्या गोष्टी मन करूं शकतें; या पलीकडे तें स्वतःच्या बळावर सुसंवादी संघटनाच्या बाबतींत कांहीं करूं शकत नाहीं. अति-मानसिक तत्त्वाची अशी गोष्ट नाहीं; तें तत्त्व पराप्रकृतीच्या आधारानें प्रत्येक वस्तूचें व घटनेचें सत्य पाहून त्याच्या अनुसंधानानें जगाच्या व्यवस्थेंत सुसंवाद आणि समतोल आणूं शकेल.

अतिमानसिक पराप्रकृति, आमच्या सामान्य अज्ञान प्रकृतीच्या सर्व मूल्यांना मागें टाकते. आमचे प्रमाणभूत आचार विचार, आमचीं मूल्यें ही अज्ञानाची निर्मिति असते आणि म्हणून पराप्रकृतीचें जीवन त्यांनीं बनूं शकत नाहीं, त्यांच्या आधारानें आंखलें जाऊं शकत नाहीं. तथापि आमची आजची प्रकृति ही पराप्रकृतींतूनच आलेली आहे. आणि ती शुद्ध ज्ञान नाहीं, अर्धवट ज्ञान हें तिचें स्वरूप आहे. म्हणून अशी कल्पना करणें युक्त होईल कीं, या आमच्या प्रकृतीच्या प्रमाणभूत विचार-आचारांत आणि मूल्यांत किंवा त्यांच्या पाठीमागें जेवढें आध्यात्मिक सत्य असेल तेवढें उच्च अतिमानसिक जीवनांत घेण्यांत येईल. अर्थात् त्या प्रमाणभूत गोष्टी प्रमाण म्हणून जशाच्या तशा घेण्यांत येणार नाहींत, तर नव्या उच्च जीवनाच्या अंशभूत व्हावयाच्या म्हणून त्यांत अवश्य तें रूपांतर करून घेण्यांत येतील त्या मूळ अज्ञानाच्या अर्धवट प्रकाशाच्या विसंवादी जीवनांतल्या असणार आणि नवें जीवन किती-तरी अधिक प्रकाशानें आणि तज्जन्य खऱ्या सुसंवादानें भरलेलें असणार. तेव्हां त्या गोष्टींना उन्नत स्वरूप दिल्यावांचून अज्ञानी जीवनांतून या नव्या उच्च जीवनांत त्यांना उचलून घेतां येत नाहीं. अतिमानसिक व्यक्ति ही सर्वात्मभूत झालेली अध्यात्मसंपन्न व्यक्ति असते; ही व्यक्ति, हा मनुष्य आपली संकुचित अस्मिता, आपला अहम् टाकून देतो, मनाच्या पार जातो. तेथें पराप्रकृतींत अधिक पूर्ण ज्ञानाचा लाभ त्याला होतो. या ज्ञानाच्या लाभामुळें पूर्वीचीं मनोरचित अन्योन्य-विरोधीं ध्येयें त्याच्यापासून गळून पडतात; त्या ध्येयांच्या मागें जें सत्य असतें तेवढें मात्र परा प्रकृतीच्या जीवनांत टिकून राहतें. अतिमानसिक जाणीव ही अशी जाणीव असते कीं तेथें अन्योन्य विरोधी गोष्टी, अन्योन्यविरोधी रहात नाहींत, सर्व अन्योन्यविरोध मावळतो, अन्योन्य विरोधक वितळून एकमेकांत मिळून जातात; याचें कारण, त्या जाणिवेच्या ठिकाणीं उच्चतर प्रकाशांत अवलोकन चालतें, जीवन चालतें; तेथें आत्मज्ञानांत, विश्वज्ञानांत एकतेचा प्रत्यय प्रमुख असतो. अतिमानसिक मानव मनोरचित ध्येयें आणि मानदंड मानीत नाहीं;

स्वतःकरितां, अहम् करितां जगायला, मानवतेकरतां, दुसऱ्याकरतां जगायला, समाजाकरतां सरकार करतां जगायला तो तयार होणार नाहीं; असें जगण्याकरतां त्याचें मन वळवितां येणार नाहीं; कारण वरील गोष्टी अर्ध सत्यें आहेत; या अर्ध सत्यांतून श्रेष्ठ असें कांहीं त्याच्या नजरेसमोर सतत असतें, दिव्य सद्वस्तु सतत त्याच्या नजरेसमोर असते. या सद्वस्तूकरतां, या सत्य ईश्वराकरतां तो जगेल, स्वतःच्या हृदयांत आणि सर्वांच्या हृदयांत राहणाऱ्या ईश्वराची जी इच्छा असेल त्या इच्छेच्या पूर्तीकरतां तो जगेल, विशाल विश्वव्यापक दृष्टि ठेवून तो जगेल, विश्वातीत, परात्पर केवळ परब्रह्माची जी इच्छा त्या इच्छेच्या प्रकाशांत तो आपलें जीवन चालवील. या प्रकारचा त्याचा जीवन हेतु असल्यानें त्याच्या जीवनांत आणि सर्वच अतिमानसिक जीवनांत स्वार्थ-परार्थ हा विरोध असणार नाहीं. कारण अतिमानसिक जीवाचा आत्मा सर्वांच्या आत्म्याशीं एकरूप असतो; त्याचप्रमाणें व्यक्तिवाद, आणि समुदायवाद अशा दोन ध्येयांचा सामान्य जनांत झगडा असतो तसा तो अतिमानसिक जीवनांत असणार नाहीं; कारण हे दोन्ही वाद एका उच्चतर सत्याच्या दोन बाजू आहेत. हें सत्य ज्याप्रमाणांत हे वाद आपापल्या परीनें व्यक्त करीत असतील, त्या सत्याची इच्छा या वादांच्या पूर्तीनें ज्या प्रमाणांत पूर्ण होत असेल, त्या प्रमाणांतच अतिमानसिक जीवाला, त्याच्या आत्म्याला हे वाद मोलाचे वाटतील, मान्य आणि सेव्य होतील. परंतु त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, या वरील मानसिक ध्येयवादांत जो सत्यांश आहे, पण जो अगदीं अस्पष्टपणें मांडलेला असल्यानें सामान्य जनांना अंधुकपणें प्रतीत होतो किंवा मुळींच प्रतीत होत नाहीं, तो सत्यांश अतिमानसिक जीवनांत पूर्णपणें व्यवहारांत आणला जाईल, त्याच्या परिपूर्तींत कांहीं कमी पडणार नाहीं. कारण, सामान्य मानवी मूल्यें अतिमानसिक जीवाच्या अतिमानस ज्ञानाला कमी दर्जाचीं दिसत असल्यामुळें तो ज्याप्रमाणें मानवता, समाज, सरकार, दुसरे जीव, स्वतः आपण, यांपैकीं कोणालाहि ईश्वराच्या जागीं बसवीत नाहीं व ईश्वराला बाजूला ठेवून सेवा करण्यास योग्य मानीत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या जीवनकार्याचा भाग म्हणून तो स्वतःमधील दिव्य सत्याला, देवत्वाला व्यवहारांत मूर्तस्वरूप देतो; दुसऱ्या सर्वांत असणाऱ्या देवत्वाची त्याला अनुभूति असते. त्या देवत्वालाहि तो मान देतो. मानवतेशीं, दुसऱ्या सर्व जीवांशीं, सर्व जगांशीं त्यांतील देवत्वामुळें, त्या देवत्वाच्या अनुभूतीमुळें तो एकरूप झालेला असतो; आणि ही अनुभवाची एकरूपता तो, आपल्या व्यवहारांत व्यक्त करतो; त्याचप्रमाणें या सर्वांत दिवसानुदिवस सत्याचा, देवत्वाचा आविष्कार जो वाढत असतो, त्या अंतर्गत आविष्काराचा असा त्याच्या बाह्य व्यवहारांत आविष्कार व्हावा, दिवसानुदिवस या आविष्काराचा प्रकार अधिक चांगला व्हावा आणि त्याचें प्रमाण व क्षेत्र वाढत जावें यासाठीं अतिमानसिक जीव स्वतः त्या प्रकारचें उदाहरण घालून देतो——हें सर्व तो, आपल्या सामान्य जीवन व्यवहाराचा एक सामान्य भाग म्हणून करतो. याप्रमाणें त्याच्या व्यवहाराची दिशा निश्चित असते, तरी या दिशेनें तो कोणती विशिष्ट गोष्ट करील तें सामान्यतः अनिश्चित असतें. या बाबतींत त्याच्या अंतरांत जें ज्ञानाचें आणि संकल्पाचें महान् सत्य असतें त्याचें तो ऐकतो, त्याचें ऐकून तो निर्णय घेतो. हें सत्य पूर्ण, सर्वस्पर्शी आणि सर्वबंधनातीत, मर्यादातीत असतें. मनानें बुद्धीनें निर्मिलेला कोणताहि एक नियम, कोणताहि एक आदर्श तें स्वतःला बंधनकारक समजत नाहीं;——वास्तवाच्या एकंदर क्षेत्रांत पूर्ण स्वातंत्र्यानें तें कार्य करतें; हें कार्य कर-

तांना, प्रत्येक सत्याला त्याच्या योग्य जागीं योग्य तो मान, हें महान् सत्य देतें. कोणत्या शक्ती काम करीत आहेत, याचें स्पष्ट ज्ञान त्या महान् सत्याला असतें; आणि कार्य करतांना या ज्ञानाचा तें उपयोग करतें; त्याचप्रमाणें विश्वविकासाच्या प्रत्येक पावलामागें प्रत्येक घटनेमागें, प्रत्येक परिस्थितीमागें ईश्वरी आविष्कार-प्रयत्नाचा हेतु आहे हें त्याला स्वच्छ कळतें, आणि या ज्ञानाचाहि तें महान् ज्ञान-संकल्प-सत्य आपल्या कार्यांत उपयोग करतें.

——श्रीअरविंद

# श्रद्धा

भगवंतावर, भगवत्कृपेवर, साधनेच्या खरेपणावर, मानसिक-प्राणिक-शारीरिक अडचणींवर, शेवटीं होणाऱ्या आत्म्याच्या विजयावर, साधनमार्ग आणि गुरु यांवर, हेकेल, हक्सले अथवा बर्टांड रसेल प्रभृतींच्या तत्त्वज्ञानांत ज्या गोष्टी ग्रथित झाल्या आहेत त्यांहिपेक्षां कांहीं वेगळ्या गोष्टींच्या अनुभूतीवर श्रद्धा ठेवा. कारण या गोष्टी जर खऱ्या नसतील तर योगाला कांहींच अर्थ रहणार नाहीं.

★

कोणी 'अविवेकी श्रद्धा' बाळगावी असें मी सांगत नाहीं; सांगणें इतकेंच कीं धीरयुक्त, शांत विवेकानें सुरक्षिलेली मूलभूत श्रद्धा हवी; कारण आध्यात्मिक मार्गानें चालणाऱ्या साधकानें हेंच करणें योग्य. मी याचाच अंगिकार केला होता, आणि मला असें आढळून आलें कीं, "जी जी गोष्ट अतिभौतिक असेल त्या प्रत्येक गोष्टीविषयीं तुम्ही शंका घेतली पाहिजे अथवा तसें करावयाचें नसेल तर संपूर्णतः भोळसट व्हावयास पाहिजे" हें जें पदार्थवादानें हातचें म्हणून राखून ठेवलेलें शृंगापत्तिरूपीं भांडवल त्याचीहि गरज रहात नाहीं. मला असें दिसून आलें आहे कीं, मी नकार दिला असतांहि, तुझा संशय याच सूत्राभोंवतीं पिंगा घालीत आहे; यावरून माझ्याच विधानास पुष्टि मिळते कीं, संशयानें पिसाटलेल्या मनाची खात्री पटविणें अशक्य असतें; कारण स्वाभाविकपणेंच त्या मनाला खात्री करून घ्यायला नकोच असतें, पुनः पुनः तेंच तेंच कारण तें पुढें मांडीत राहतें.

★

मानवी देहांतील पेशीपेशींतून श्रद्धा कार्य करते. हें कार्य म्हणजे चंद्राचा तुकडा पाडून खाण्यासारखें अशक्य आहे असें तुम्ही कसें म्हणतां हें मला समजत नाहीं. चंद्राचा तुकडा पाडून कोणाच्याच हातीं आजवर पडलेला नाहीं; मात्र पेशीपेशींतून कार्य करणाऱ्या श्रद्धेच्या

बळावर व्याधी बऱ्या करतां येतात हें प्रत्यक्ष सत्य आहे, तो एक प्रकृतीचा कायदा असून त्याचे प्रत्यक्ष प्रयोग योगबाह्य घटनांतहि अनेकदां करून दाखविण्यांत आलेले आहेत. श्रद्धा आणि तीबरोबर इतर साऱ्या गोष्टी संपादन करून घेण्याचा मार्ग एकच. तो म्हणजे त्या मिळविण्याचा आग्रह धरणें आणि त्या प्राप्त होईपर्यंत आपल्याकडून कसलेंच शैथिल्य न पडूं देणें, निराश न होणें अथवा प्रयत्न न सोडणें. दुष्प्राप्य अशा वस्तूंनीं युक्त असलेल्या या पृथ्वीवर विचार करणारे आणि आकांक्षा धरणारे जीव संचरूं लागल्यापासून हरएक वस्तु प्राप्त करून घेण्याचा हाच एकमेव मार्ग बनून गेला आहे. ज्योतिर्मय तत्त्वास आपल्यामध्यें कार्य करतां यावें म्हणून स्वतःस नित्य निरंतर त्या तत्त्वापुढें उन्मुख करणें आणि तिमिराकडे पाठ वळविणें हाच तो मार्ग. "तुला शक्य नाहीं, तुला शक्य होणार नाहीं, तूं असमर्थ आहेस, तूं एक स्वप्नसृष्टींतील बाहुली आहेस" अशा तऱ्हेच्या ज्या सूचना आपल्याला सतत ऐकूं येत असतात त्यांच्याकडे दुर्लक्ष करावयाचें. कारण त्या विरोधी शक्तींकडून आलेल्या असतात. फळ हातीं पडूं नये म्हणून त्या शक्ती आपल्या कर्कश आरडाओरडयानें तुम्हांला आडमार्गाला नेऊन वंचित करतात आणि मग मोठ्या विजयोन्मादानें असें भासवितात कीं हा एकूण मार्गच निरर्थक, निष्फळ प्रयत्नांचा आहे. साधनाविषयक प्रयत्न कठीण असतात हें सर्वश्रुत असलें तरी जें कठीण असतें तें अशक्यच असतें असें नाहीं––उलट ज्या गोष्टी कठीण होत्या त्याच गोष्टी लोकांनीं आजपर्यंत संपादन केलेल्या आहेत. संकटांवर विजय मिळविणें हें तर जगाच्या इतिहासाचें एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होऊन बसलें आहे. अध्यात्मविषयक प्रयत्नांतहि तसेंच असणार.

तुम्ही फक्त एकच गोष्ट करावयाची आहे. संशयाच्या राक्षसाला ठार मारण्याच्या कार्याला निश्चयपूर्वक लागावयाचें. तें झाल्यावर मन किंवा प्राण यांनीं ज्यांचा ज्यांचा मार्ग रोधून धरला होता त्यांचा मार्ग जसा मोकळा झाला तसा तो तुमच्याहि बाबतींत होईल.

––श्रीअरविन्द

---

ज्याविषयीं आपण चिंतन करीत असतो, त्याच वस्तूंनीं आपण नेहमीं वेढलेले असतो.

*

विरोधी शक्तींविषयींच सारखा विचार करणें व त्यांची भीति बाळगणें हें एक अति घातक दौर्बल्य आहे.

*

स्नायूंप्रमाणेंच एकाग्रता व इच्छाबल यांची वाढ करतां येते : नियमित अभ्यास व व्यायाम यांयोगें त्यांची वाढ होते.

–श्रीमाताजी

# फुलांचे आध्यात्मिक अर्थ

(नोव्हेंबर अंकावरून पुढें)

१) जास्वंद—अग्नि.
२) गुलाब—(अत्यंत फिका, फेंच)—भगवंता विषयीं वाटणारी आत्मीयता.
३) " —(पांढरा)—भगवंताविषयीं सर्वांगीण प्रेम.
४) " —(पिवळा)—भगवंताविषयीं मानसिक प्रेम.
५) " —(पिवळा, पांकळ्यांचीं टोंकें लाल)—आत्म्याच्या वर्चस्वाखालील मानसिक प्रेम.
६) " —(चिनी गुलाब)—भगवंताविषयीं अत्यंत सुकुमार प्रेम.
७) " —(गुलाबी)—भगवंताविषयीं आंतरात्म्यास वाटणारें प्रेम.
८) डाळिंबाचें फळ—पृथ्वीवर पसरलेलें दिव्य प्रेम.
९) कर्दळ—(पिवळें लहान पाकळ्यांचें फूल)—अतिमानस भूमिकेवरून भगवंताशीं झालेली मैत्री.
१०) कर्दळ (कळी, तांबडी) भगवंताशीं मैत्री.
११) कण्हेर—(एकेरी, तांबडी)—अनिष्ट प्रवृत्तींचे इष्ट प्रवृत्तींमध्यें रूपांतर.
१२) हदगा—(पांढरा)—साक्षात्काराची सुरुवात.
१३) पळस—(तांबडा)—बाह्यवर्ति सिद्धीची सुरुवात.
१४) सूर्यफूल—(नारिंगी मेक्सिकन)— भगवंताकडे संपूर्णपणें वळलेली भौतिक चेतना.
१५) सूर्यफूल—(जपानी जातीचें, पिवळें, मध्य-तपकिरी)—प्रकाशाभिमुख चेतना.
१६) आंब्याचा मोहोर—निसर्गाला वाटणारी सिद्धीची आशा.
१७) बाहवा—(पिवळीं फुलें)—कल्पनाशक्ति.
१८) शेवगा—आरोग्यदायी सुरचना.
१९) झेनिया—(शेंदरी)—सहनशीलता. सोशिकपणा.
२०) " —(पांढरा)—सर्वांगीण सहनशीलता.
२१) " —(पिवळा)—मानसिक सहनशीलता.
२२) " —(पिवळा व शेंदरी मिश्रित)—भौतिक मनाची सहनशीलता.
२३) " —(तांबडा)—शारीरिक सहनशीलता.
२४) " ;–(गुलाबी)—आंतरात्मिक सहनशीलता.
२५) मेंदी—(तांबडी फुलें)—भगवंताविषयीं रोमारोमांतून वाटणारा जिव्हाळा.
२६) " —(गुलाबी)—भगवंताविषयीं वाटणारा आंतरात्मिक जिव्हाळा.
२७) " —(जांळी)—भगवंताविषयीं वाटणारा भावनांचा जिव्हाळा.
२८) " —(पांढरी)—भगवंताविषयीं वाटणारा विशुद्ध जिव्हाळा.

नियतकालिकांच्या रेजिस्ट्रेशन बाबतच्या केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम ८ यांस अनुसरून फार्म नं० ४ प्रमाणें.

# 'संजीवनचें' प्रकटन

१. प्रकाशनस्थळ—संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.

२. नियतकालिकाचें स्वरूप—१५ आगस्ट, २४ नोव्हेंबर, २१ फेब्रुवारी व २४ एप्रिल या तारखांस प्रसिद्ध होणारें त्रैमासिक.

३. मुद्रकाचें नांव—श्री० भालचंद्र लिमये.
राष्ट्रीयत्व—भारतीय.
पत्ता—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.

४. प्रकाशकाचें नांव—श्री० भालचंद्र लिमये.
राष्ट्रीयत्व—भारतीय.
पत्ता—श्रीअरविंद आश्रम पांडीचेरी.

५. संपादकाचें नांव—श्री० भालचंद्र लिमये.
राष्ट्रीयत्व—भारतीय.
पत्ता—श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.

६. नियतकालिकाचे मालक व पत्ता : संजीवन कार्यालय श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.

मी, श्री० भालचंद्र लिमये, असें प्रकट करतो कीं वर दिलेला तपशील माझ्या माहिती-प्रमाणें खरा आहे.

२४ एप्रिल १९५८

भा० द० लिमये.
प्रकाशक.

# दिव्य जीवन

## ग्रंथ–प्रकाशन–योजना

श्रीअरविंदांच्या Life Divine या अमोलिक महान् ग्रंथाचा सुबोध मराठी अनुवाद सेनापति पां.म.बापट यांनीं पुरा केला असून त्याचें प्रकाशन आम्ही हातीं घेत आहोंत. ग्रंथ दोन खंडांत प्रसिद्ध होईल. डेमी आकाराचीं सुमारें २००० पृष्ठें होतील. पहिला खंड एक वर्षांत छापून पूर्ण होईल. या ग्रंथाकरतां आगाऊ रक्कम भरणारांस सवलतीनें रु० २५ मध्यें दोन्ही खंड मिळूं शकतील. टपाल खर्च वेगळा पडेल. पुणें, नागपूर, नगर, मुंबई या ठिकाणच्या केंद्रांतून ग्रंथ नेल्यास टपाल खर्च पडणार नाहीं. ग्रंथप्रकाशनानंतर दोन्ही खंडांची किंमत ३५ रुपये पडेल. तरी ग्राहकांनीं खालील पत्त्यावर अथवा आमच्या सहीची पावतीपुस्तकें घेऊन येणाराजवळ पैसे भरून आगाऊ नांवें नोंदवावींत.

आमच्या या प्रकाशनकार्यास महाराष्ट्र–जनता संपूर्ण पाठिंबा देईल असा विश्वास आहे.

**पुणें–विभाग**
**श्री.डॉ.य.वि.फाटक**
**एम्.डी**
**३३/३२ एरंडवणा, पुणें –४**

**व्यवस्थापक**
**भा.द.लिमये**
**संजीवन कार्यालय**
**श्रीअरविंद आश्रम पाँडिचेरी**